RNI NO. MAHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ७ वे, अंक नं. : ३१

दि. २१ मे २०२६, वार : गुरूवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रू.

दैनिक

# महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक : अशोक हनवते, मो. 9421094991, 7264079990

# अणुऊर्जा क्षेत्रात महाराष्ट्र नेतृत्वासाठी सज्ज ; अमेरिकन कंपन्यांनी महाराष्ट्रात गुंतवणूक करावी - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई/प्रतिनिधी :** कृत्रिम बुद्धिमत्ता, डेटा सेंटर, सेमीकंडक्टर, हरित हायड्रोजन, इलेक्ट्रिक मोबिलिटी आणि प्रगत उत्पादन क्षेत्रामुळे आगामी काळात स्थिर व अखंड वीजेची मागणी मोठ्या प्रमाणात वाढत आहे. केवळ सौर आणि पवन उर्जेवर दीर्घकालीन औद्योगिक विकास शक्य नसून अणुऊर्जा (न्यूक्लिअर पॉवर) ही भविष्यातील औद्योगिक अर्थव्यवस्थेसाठी महत्त्वाची ठरणार आहे. महाराष्ट्र अणुऊर्जा क्षेत्रातील परिवर्तनाचे नेतृत्व करण्यास तयार असून अमेरिकन कंपन्यांनी महाराष्ट्रात गुंतवणूक करावी, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

यूएस न्यूक्लिअर एक्झिक्यूटिव्ह मिशन इन इंडिया अंतर्गत आयोजित न्यूक्लिअर एनर्जी इन्स्टिट्यूट आणि युएस-इंडिया स्ट्रॅटेजिक पार्टनरशीप फोरमच्या बैठकीत मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते.

बैठकीस ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्रा, उद्योग विभागाचे प्रधान सचिव पी. अनबलगन, महाजनकोचे मुख्य कार्यकारी अधिकारी राधाकृष्णन बी., मुख्यमंत्री यांचे गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे, राजशिष्टाचार विभागाचे सचिव राजेश गवांदे यांच्यासह अमेरिकेतील न्यूक्लिअर एनर्जी इन्स्टिट्यूटच्या अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी मारिया ग्रेस कोर्सनिक, सेंट्रस एनर्जीचे उपाध्यक्ष डॅन लिस्टिको, क्लीन कोअर थोरियम एनर्जीचे मुख्य कार्यकारी अधिकारी मेहुल शाह, न्यूक्लिअर कर्टिस-राइट कॉर्पोरेशनचे उपाध्यक्ष गॅरी वोल्स्की, यूएस-इंडिया स्ट्रॅटेजिक पार्टनरशिप फोरमच्या व्यवस्थापकीय संचालक निवेदिता मेहरा, एडलो इंटरनॅशनल कंपनीचे अध्यक्ष जॅक एडलो, तसेच होल्टेक एशियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि धोरणात्मक भागीदारी प्रमुख अनंत जैन यांच्यासह विविध अमेरिकन कंपन्यांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, जगभरात ऊर्जा संक्रमणाच्या प्रक्रियेत मोठे बदल होत आहेत. गेली अनेक वर्षे सौर आणि पवन ऊर्जा ही नवीकरणीय ऊर्जा हीच भविष्यातील ऊर्जा समस्या सोडवेल, अशी धारणा होती. मात्र आता वाढत्या औद्योगिकीकरणामुळे आणि डिजिटल अर्थव्यवस्थेमुळे स्थिर व सातत्यपूर्ण वीज निर्मितीची गरज प्रकर्षाने जाणवत आहे. महाराष्ट्र सौर आणि पवन उर्जेत मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करत असला तरी कार्बनमुक्त आणि औद्योगिक स्तरावरील बेसलोड ऊर्जा पुरवठ्यासाठी न्यूक्लिअर ऊर्जा अत्यावश्यक ठरणार आहे. महाराष्ट्र हा ६६० अब्ज डॉलर अर्थव्यवस्थेचा देशातील अग्रगण्य औद्योगिक राज्य असून भारतातील एकूण परकीय गुंतवणुकीपैकी ४० टक्क्यांहून अधिक गुंतवणूक महाराष्ट्रात येते. मुंबई आणि नवी मुंबई परिसरात देशातील जवळपास ६० टक्के डेटा सेंटर क्षमता केंद्रित आहे. आगामी काळात सेमीकंडक्टर, कृत्रिम बुद्धिमत्ता, लॉजिस्टिक्स आणि प्रगत उत्पादन क्षेत्रामुळे वीजेची मागणी अनेक पटींनी वाढणार आहे.

भारत-अमेरिका नागरी अणुऊर्जा सहकार्याबाबत गेल्या काही वर्षांत अनेक सकारात्मक बदल झाले असून खासगी क्षेत्राचा सहभाग, 'शांती' फ्रेमवर्कअंतर्गत सुधारणा, तंत्रज्ञान हस्तांतरण आणि औद्योगिक सहकार्यामुळे नव्या संधी निर्माण झाल्या आहेत. भारत हा आगामी अनेक दशकांत वेगाने वाढणारी वीज मागणी असलेला देश ठरणार असून महाराष्ट्र हा त्यातील सर्वात मोठा औद्योगिक घटक ठरणार आहे.

भारताच्या अणुऊर्जा क्षेत्राच्या पुढील प्रवासात महाराष्ट्र केंद्रस्थानी ठरणार असून महाराष्ट्राला केवळ आयात केलेल्या अणुभट्ट्यांचा ग्राहक म्हणून नव्हे, तर न्यूक्लिअर उत्पादन, तंत्रज्ञान भागीदारी




आणि जागतिक निर्यात केंद्र म्हणून विकसित करण्याचा निर्धार आहे. यासाठी राज्याकडे सक्षम औद्योगिक यंत्रणा, जागतिक दर्जाची बंदरे, लॉजिस्टिक सुविधा, तांत्रिक कौशल्य असलेले मनुष्यबळ, अभियांत्रिकी क्षमता आणि उद्योगपूरक धोरणे उपलब्ध असल्याचे श्री. फडणवीस यांनी नमूद केले.

अमेरिकन कंपन्यांनी महाराष्ट्रात न्यूक्लिअर उत्पादन व प्रकल्प उभारणीसाठी पुढाकार घेतल्यास राज्य सरकारकडून औद्योगिक जमीन, पायाभूत सुविधा, कौशल्य विकास, संशोधन सहकार्य आणि उत्पादन क्लस्टर उभारणीसाठी मदत केली जाईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली. सुरुवातीच्या टप्प्यातील उद्योगांसाठी अनुदान आणि विशेष सवलती देण्याची तयारी असल्याचेही त्यांनी सांगितले.

छोट्या स्वरुपातील स्मॉल मॉड्युलर रिॲक्टर्स () क्षेत्रातही महाराष्ट्र प्रारंभीचे केंद्र बनण्यास उत्सुक असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. औद्योगिक अर्थव्यवस्थेच्या भविष्यातील गरजांशी एसएमआर तंत्रज्ञान सुसंगत असून पुढील पिढीच्या न्यूक्लिअर उर्जेसाठी महाराष्ट्र आदर्श प्रयोगभूमी ठरू शकतो, असे त्यांनी नमूद केले.

भारत आणि अमेरिका यांच्यातील संबंध आता तंत्रज्ञान, संरक्षण, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि पुरवठा साखळी या क्षेत्रांत अधिक मजबूत होत आहेत. नागरी अणुऊर्जा सहकार्य हे या भागीदारीच्या पुढील टप्प्यातील निर्णायक क्षेत्र ठरू शकते. न्यूक्लिअर ऊर्जा ही केवळ वीज निर्मिती नसून औद्योगिक स्पर्धात्मकता, तांत्रिक नेतृत्व, ऊर्जा सार्वभौमत्व, हवामान बदलाची जबाबदारी आणि दीर्घकालीन विश्वासाशी संबंधित विषय असल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी स्पष्ट केले.

श्रीमती मारिया कोर्सनिक यांनी भारतामध्ये न्यूक्लिअर ऊर्जा क्षेत्रात मोठी संधी असल्याचे नमूद केले. महाराष्ट्रात कुशल मनुष्यबळ, औद्योगिक तंत्रज्ञान आणि सप्लाय चेन असल्याने येथे गुंतवणुकीची मोठी संधी असल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले.

यावेळी ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला यांनी सादरीकरणाद्वारे राज्यातील वाढती ऊर्जेची गरज, सध्याची निर्मिती क्षमता आणि भविष्यात न्यूक्लिअर उर्जेची आवश्यकता याविषयी माहिती दिली. राज्यातील सध्याची वीज मागणी ३१ गिगावॅट असून २०३० पर्यंत ती ४२ गिगावॅटपर्यंत वाढण्याचा अंदाज आहे. राज्यात सौर ऊर्जा, बॅटरी स्टोरेज, हरित हायड्रोजन आणि ऊर्जा संक्रमणासाठी मोठ्या प्रमाणावर प्रकल्प राबविण्यात येत असल्याची माहिती त्यांनी दिली. महाराष्ट्राने नूतनीकरणक्षम ऊर्जेत मोठी प्रगती केली असून २०३५ पर्यंत राज्याच्या ६५ टक्के ऊर्जेची गरज नूतनीकरणक्षम स्रोतांतून पूर्ण करण्याचे लक्ष्य आहे. भविष्यातील वाढती ऊर्जा गरज लक्षात घेता अणुऊर्जा हे राज्याचे पुढील महत्त्वाचे उद्दिष्ट असून त्यासाठी राज्याने तयारी सुरू केल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले.

महाजनकोचे व्यवस्थापकीय संचालक राधाकृष्णन बी यांनी महाजनकोतर्फे सुरू असलेल्या विविध ऊर्जा प्रकल्पांचा आढावा सादर केला. पुढील दोन दशकांत ७ हजार मेगावॅट अणुऊर्जा निर्मितीचे लक्ष्य निश्चित केल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. सध्या १४.५ गिगावॅट क्षमतेची देशातील सर्वात मोठी राज्य सरकारी वीजनिर्मिती कंपनी म्हणून महाजनको कार्यरत आहे. ऊर्जा क्षेत्रातील बदल लक्षात घेता कोळसा आधारित उत्पादनाऐवजी अणुऊर्जेवर भर दिला जात आहे. राज्यातील औद्योगिक परिसरांच्या गरजेनुसार स्मॉल मॉड्युलर रिॲक्टर तंत्रज्ञानाचा वापर करण्याचाही विचार सुरू आहे. स्टील, सिमेंट, खत उद्योग आणि डेटा सेंटर्सना अशा प्रकल्पांमधून ऊर्जा पुरवली जाऊ शकते, असे त्यांनी नमूद केले.

यूएस-इंडिया स्ट्रॅटेजिक पार्टनरशिप फोरमच्या व्यवस्थापकीय संचालक निवेदिता मेहरा यांनी प्रास्ताविकात बैठकीची पार्श्वभूमी विशद केली.यावेळी उपस्थित मान्यवरांनी महाराष्ट्रातील अणुऊर्जा क्षेत्र, त्यातील सुविधा व गुंतवणुकीची संधी याविषयी मते मांडली.

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेच्या अर्जातील त्रुटी पूर्ततेसाठी ३० मे पर्यंत अंतिम मुदत

**लातूर/प्रतिनिधी :** राज्य शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजने अंतर्गत ज्या विद्यार्थ्यांच्या अर्जांमध्ये त्रुटी आढळल्या आहेत, त्यांना या त्रुटींची पूर्तता करण्यासाठी ३० मे २०२६ पर्यंत अंतिम मुदत देण्यात आली आहे.

अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील जे विद्यार्थी शासकीय वसतिगृहात प्रवेशास पात्र असूनही जागांअभावी किंवा अन्य कारणांमुळे प्रवेश मिळवू शकले नाहीत, अशा विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिक्षण घेता यावे, यासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना राबवली जाते. या योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांच्या भोजन, निवास व इतर शैक्षणिक सुविधांसाठी आवश्यक असलेली रक्कम त्यांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये थेट वितरित करण्यात येते. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ या कालावधीसाठी ज्या विद्यार्थ्यांनी महा-आयटी पोर्टलवर नवीन किंवा नूतनीकरणासाठी ऑनलाइन अर्ज भरले आहेत, परंतु ज्यांच्या अर्जांमध्ये काही त्रुटी आढळल्या आहेत, त्यांचे अर्ज त्रुटी पूर्ततेसाठी त्यांच्या विद्यार्थी लॉगिनला परत पाठविण्यात आले आहेत.

संबंधित विद्यार्थ्यांनी त्वरित आपल्या लॉगिनवर जाऊन अर्जातील त्रुटी तपासाव्यात आणि ३० मे २०२६ पूर्वी आवश्यक त्या कागदपत्रांची किंवा माहितीची पूर्तता करून अर्ज पुन्हा सादर करावा, असे आवाहन लातूरचे समाज कल्याण सहाय्यक आयुक्त यादव गायकवाड यांनी केले आहे. मुदतीनंतर येणाऱ्या अर्जांचा विचार केला जाणार नाही, असे त्यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

## पाणी पुरवठा व जल जीवन मिशनच्या कामांचा जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी घेतला आढावा

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्ह्यात सुरु असलेल्या जल जीवन मिशनसह पाणी पुरवठा योजनांच्या कामांचा जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात मंगळवारी आढावा घेतला. या योजनांच्या कामांसह पाणी पुरवठा योजनांच्या स्रोतांचे बळकटीकरण, पुनर्भरण आदी उपक्रमांना प्राधान्य देण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी केल्या. जिल्हा परिषदेचे पाणी व स्वच्छताचे उपमुख्य कार्यकारी मोहन अभंगे, ग्रामीण पाणी पुरवठा यंत्रणेचे कार्यकारी अभियंता बाळासाहेब शेलार यांच्यासह महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, भूजल सर्वेक्षण व विकास प्राधिकरणचे अधिकारी या बैठकीला उपस्थित होते.

जल जीवन मिशन अंतर्गत जिल्ह्यात प्रगतीपथावर असलेल्या योजनांना गती द्यावी. त्यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करावे. पाणी पुरवठा योजनांचे जलस्रोत कायमस्वरूपी कार्यरत राहण्यासाठी या योजनांच्या जलस्रोतांचे पुनर्भरण करणे आवश्यक आहे. यासाठी ग्रामीण पाणी पुरवठा यंत्रणा, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, जिल्हा परिषदेचा पाणी व स्वच्छता विभाग, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, मृद व जलसंधारण विभाग आणि लघु पाटबंधारे विभागांनी जलस्त्रोतांमधील गाळ उपसा करणे, विहिरी व विंधन विहिरींचे पुनर्भरण यासारखे उपक्रम हाती घ्यावेत. यामध्ये जास्तीत जास्त लोकसहभाग मिळविण्यासाठी प्रयत्न करावा, अशा सूचना जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड यांनी यावेळी दिल्या. जिल्ह्यात पिण्याच्या पाण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या जलस्रोतांची नियमित तपासणी करण्याच्या सूचनाही जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी दिल्या. तसेच जल जीवन मिशन, पाणी पुरवठा योजनांच्या सद्यस्थितीचा सविस्तर आढावा घेवून आवश्यक सूचना केल्या. ग्रामीण पाणी पुरवठा यंत्रणेचे कार्यकारी अभियंता श्री. शेलार यांनी जल जीवन मिशन योजनेच्या अंमलबजावणीबाबत माहिती दिली.

## स्मार्ट प्रकल्पांतर्गत उत्पादक भागीदारी उपप्रकल्पाचे काम तातडीने पूर्ण करा - कृषी मंत्री दत्तात्रय भरणे

**मुंबई/प्रतिनिधी :** मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पांतर्गत उत्पादक भागीदारी उपप्रकल्पासाठी अनुदान वितरणाबाबत सर्व बाजूंनी सखोल तपासणी करून प्रकल्प पूर्णत्वास नेण्यासाठी तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश कृषीमंत्री दतात्रय भरणे यांनी दिले.

मंत्रालयात आयोजित स्मार्ट प्रकल्पाच्या आढावा बैठकीत उत्पादक भागीदारी उपप्रकल्पांतर्गत प्रथम अनुदान हप्ता वितरणास मुदतवाढ देण्याबाबत चर्चा करण्यात आली. यावेळी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे बोलत होते. बैठकीला व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे स्मार्ट प्रकल्पाचे प्रकल्प संचालक प्रदीप चंद्रन, कृषी संचालक सुनिल बोरकर, उपसचिव गणेश कचरे तसेच फार्मेक्सो ॲग्रो प्रोड्युसर कंपनी लिमिटेड, रेंदाळचे धन्यकुमार कोळी आणि महावीर पाटील उपस्थित होते.कृषि मंत्री दतात्रय भरणे म्हणाले की, अपवादात्मक परिस्थिती लक्षात घेता शेतकरी व उत्पादक संस्थांच्या हितासाठी सकारात्मक भूमिका घेत आवश्यक कार्यवाही करण्यात यावी. तसेच प्रकल्पाची अंमलबजावणी वेळेत आणि प्रभावीपणे पूर्ण होण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

## शिवलिंग नागापुरे यांचा जिल्हाधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या हस्ते सन्मान

**लातूर/प्रतिनिधी :** लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४, विधानसभा सर्वत्रिक निवडणूक २०२५, औसा नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक, जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ या निवडणूक कामात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल जिल्हा परिषद कन्या प्रशाला भादा येथील माध्यमिक शिक्षक शिवलिंग उमाकांत नागापुरे यांचा लातूरचे जिल्हाधिकारी डॉ.भारत बास्टेवाड, लातूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना, औसा विधानसभेचे आमदार अभिमन्यू पवार आणि इतर मान्यवरांच्या हस्ते औसा येथे झालेल्या कार्यक्रमात विशेष सन्मानपत्र देऊन सन्मान करण्यात आला.



शिवलिंग नागापुरे यांनी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक, विधानसभा सार्वत्रिक निवडणूक, औसा नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक, जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक ह्या सर्व निवडणुकीच्या कामासाठी नियुक्त अधिकारी आणि कर्मचारी यांना उत्कृष्ट प्रशिक्षण देणे, आणि निवडणुकीच्या प्रशासकीय कार्यात केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन औसा- रेणापूर उपविभागीय अधिकारी कार्यालय लातूर आणि तहसील कार्यालय औसा यांच्या वतीने शिवलिंग नागापुरे यांचा,औसा येथील विजय मंगल कार्यालय येथे आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महाराज अभियान शिबिरात जिल्हाधिकारी लातूर, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद लातूर आणि औसा विधानसभेचे आमदार आणि इतर मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

यावेळी औसा रेणापूर उपविभागीय अधिकारी अविनाश कोरडे, औसा तहसीलदार घनश्याम अडसूळ, नायब तहसीलदार सुरेश पाटील, औसा नगर परिषदेचे मुख्याधिकारी मंगेश शिंदे,औसा पंचायत समितीच्या सभापती सौ. गंगाबाई कोदळीकर, संतोषजी मुक्ता, बसवराज धाराशिवे आणि विविध प्रशासकीय अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

## २२ मे रोजीचे लातूर येथील दिव्यांग तपासणी शिबीर स्थगित; युडीआयडी पोर्टल तात्पुरते बंद राहणार

**लातूर/प्रतिनिधी :** युआयडी पोर्टलवरील सूचनेनुसार एनएसजी क्लाऊड सर्व्हर अपग्रेडेशनच्या कामामुळे २१ ते २४ मे २०२६ या कालावधीत युडीआयडी पोर्टल तात्पुरत्या स्वरूपात बंद राहणार आहे. या तांत्रिक कारणास्तव, शुक्रवारी म्हणजेच २२ मे २०२६ रोजी लातूर शहर व ग्रामीण भागातील दिव्यांग व्यक्तींची गैरसोय होऊ नये, यासाठी त्या दिवशीचे दिव्यांग तपासणी शिबीर स्थगित करण्यात आले आहे.

पोर्टल बंद असल्याने २२ मे रोजी दिव्यांग बांधवांनी तपासणी शिबीरासाठी येऊ नये, असे आवाहन विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे. संबंधित दिव्यांग व्यक्तींनी याची नोंद घेऊन सहकार्य करावे, असे प्रशासनातर्फे कळविण्यात आले आहे.

## व्ही एस पँथर्स विद्यार्थी आघाडीचे नीट पेपरफुटी प्रकरणी गांधी चौकात निषेध आंदोलन

**लातूर/प्रतिनिधी :** येथील व्ही एस पँथर्स युवा संघटनेचे सं अध्यक्ष विनोदभाऊ खटके यांच्या सूचनेनुसार व्ही एस पँथर्स विद्यार्थी आघाडी जिल्हाध्यक्ष स्वप्नील कांबळे यांच्या नेतृत्वाखाली गांधी चौकात नीट पेपर फुटी प्रकरणी निषेध आंदोलन करण्यात आले. यावेळी प्रा शिवराज मोटेगावकर, प्रा पी व्ही कुलकर्णी, प्रा मनीषा मांढरे, केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या निषेधार्थ घोषणाबाजी करण्यात आली. यानंतर जिल्हाधिकारी महोदयांची भेट घेऊन रीतसर लेखी स्वरुपात निवेदन देण्यात आले यामध्ये लातूर शहरातील सर्व खाजगी क्लासेस वाल्यांची चौकशी करण्यात यावी तसेच अटकेत असलेल्या लोकांची सखोल चौकशी करून भ्रष्टाचाराच्या माध्यमातून






कमावलेली संपत्ती सील करण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

यावेळी विद्यार्थी आघाडीचे मराठवाडा अध्यक्ष प्रीतम दंडे जिल्हाध्यक्ष स्वप्नील कांबळे जिल्हाध्यक्ष शरद किनीकर संपर्कप्रमुख आनंद जाधव ग्रुप जिल्हाध्यक्ष अजय सूर्यवंशी ऑटो युनियन जिल्हाध्यक्ष देवा गायकवाड विद्यार्थी आघाडी जिल्हा उपाध्यक्ष ऋषी ढगे महादेव कांबळे सुजित कांबळे रितेश जांभळे, सुबोध महाळंगीकर यांचे ऑटो युनियन शहराध्यक्ष जगदीश सरवदे सुरज कांबले, महेश सूर्यवंशी, रोहित दंडे, आविष्कार कांबळे, ओम शिंदे, स्वप्निल कठारे, तौसीफ़ तांबोळी, आदित्य कांबळे, पियूष कांबळे, निलकुमार ईगोले, श्रीकांत पुरी, अभय सूर्यवंशी, अनिकेत ढोबळे ,प्रेम जाधव आदीजन उपस्थित होते.

# संपादकीय...

## वसाहतवादी वर्चस्ववाद; भारताची प्रगती

विकसित मानल्या जाणाऱ्या नॉर्वेसारख्या देशातील पत्रकारांनाही जगाची किती जुजबी माहिती असते, ते त्यांच्याच एका पत्रकाराने परवा दाखवून दिले. केवळ पत्रकार आहे, म्हणून काहीही बिनबुडाचे आणि असत्यावर आधारित प्रश्न विचारायचा अधिकार कोणालाही नाही. पत्रकारांवरही सभ्यतेच्या आणि राजनैतिक शिष्टाचाराच्या मर्यादा पाळणे बंधनकारक. पण, मुळात वसाहतवादी वर्चस्ववादाच्या मानसिकतेतून भारताची प्रगती खुपणाऱ्या अशा युरोपियनांची संख्या कमी नाहीच! पाश्चिमात्य देशांतील वृत्तवाहिन्या आणि वृत्तपत्रांतील पत्रकारांना भारतासारख्या आशियाई देशांबद्दल अर्ध्या-कच्च्या माहितीवर आधारित आणि आपल्या राजकीय अजेंड्यानुसार मन मानेल तशा बातम्या प्रसारित करण्याचा जन्मसिद्ध अधिकार आहे, याचा प्रत्यय 'बीबीसी', 'न्यूयॉर्क टाईम्स' यांसारख्या वृत्तसंस्था देतच असतात. त्यामागे वसाहतवादी आणि गोरी वर्णवर्चस्ववादी मनोवृत्ती अजूनही कायम आहे. आता नॉर्वेसारख्या एका विकसित आणि सुसंस्कृत मानल्या जाणाऱ्या देशातील महिला पत्रकारानेही आपल्या अज्ञानाचे प्रदर्शन घडवीत असाच एक निष्कारण वाद निर्माण केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे नॉर्वेच्या एका दिवसाच्या दौऱ्यावर होते आणि तेथे त्यांनी त्या देशाशी काही महत्त्वपूर्ण करार केले. त्याची केवळ माहिती देण्यासाठी दोन्ही देशांच्या पंतप्रधानांच्या उपस्थितीत 'प्रेस ब्रीफिंग' ('प्रेस कॉन्फरन्स' नव्हे) आयोजित केली होती. त्यात प्रश्नोत्तरे अपेक्षित नव्हती. या करारांची माहिती देऊन झाल्यावर दोन्ही पंतप्रधान व्यासपीठावरून उतरत असताना एका महिला पत्रकाराने मोदी यांना उद्देशून एक प्रश्न विचारला. पण, मोदी हे त्याकडे लक्ष न देता तिथून निघून गेले. तेव्हा या महिला पत्रकाराने, ''भारतात माहितीस्वातंत्र्य नाही आणि मुक्त पत्रकारांचा आदर केला जात नाही, अशा देशावर आम्ही का विश्वास ठेवायचा,'' अशा तऱ्हेचा कांगावा सुरू केला. भारताच्या परराष्ट्र खात्याने नंतर रीतसर पत्रकार परिषद आयोजित करून या महिला पत्रकाराच्या चुकीच्या भूमिकेचा खरपूस समाचार घेतला आणि भारताची भूमिका स्पष्ट केली. मोदी आणि नॉर्वेच्या पंतप्रधानांची ही परिषद दोन देशांमध्ये झालेल्या करारांची माहिती देण्यासाठी होती. ती पत्रकार परिषद नव्हती. त्यामुळे तेथे या उच्चपदस्थांना पत्रकारांनी प्रश्न विचारणे मुळात अपेक्षितच नव्हते. इतकी सामान्य आणि मूलभूत माहितीही नसलेल्या पत्रकार महिलेने नंतर विनाकारण भारताबद्दल अवडंबर माजविले. त्यातून तिचे सामान्य अज्ञान आणि अशोभनीय वर्तनच दिसून आलेच. शिवाय या उच्चभ्रू युरोपियन लोकांच्या दृष्टिकोनातून भारत हा आजही तिसऱ्या जगातील एक देश आहे. पण, भारतातील देशी पत्रकारही परदेशी उच्चपदस्थ नेत्यांना वाटेल ते प्रश्न विचारीत नाहीत. तितकी सभ्यता आणि शिष्टाचार ते पाळतात. तसेच कुठे प्रश्न विचारायचे, याचेही औचित्य राखले जाते. पण, युरोपीय देशांतील पत्रकार व बुद्धिजीवी वर्ग हा आजही गोऱ्या वर्णवर्चस्ववादी आणि वसाहतवादी मानसिकतेतून बाहेर आलेला नाही. आशिया व आफ्रिकेतील देश हे भिकार तिसऱ्या दर्जाचे असून, त्यांना वाटेल तसे वागविण्याचा आपल्याला अधिकार आहे, अशीच त्यांची समजूत.तसेच या देशांतील सामाजिक व आर्थिक स्थिती आणि सांस्कृतिक अनुबंध लक्षात न घेता, त्यांच्यावर युरोपीय मूल्ये लादण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. मुळात भारताची सर्वांगीण प्रगती ही पाश्चमात्त्य देशांच्या अजून पचनीच पडलेली नाही. भारताचा जागतिक उदय झाला की आपले वर्चस्व कमी होईल, आपल्या बाजारपेठेचा आर्थिक दबदबा संपुष्टात येईल, याची भीती अगदी अमेरिकेसह काही युरोपीय राष्ट्रांनाही सतावताना दिसते. भारताकडे स्थिरावणारे 'ग्लोबल साऊथ'चे नेतृत्वही या 'ग्लोबल नॉर्थ'ची मक्तेदारी असलेल्या युरोपीय राष्ट्रांतील काही वसाहतवादी शक्तींना न रुचणारे. म्हणूनच भारताला, भारतीय नेतृत्वाला मुद्दाम कमी लेखण्याचा असाच कोता प्रयत्न बरेचदा केला जातो. काही वर्षांपूर्वी भारताचे प्रगल्भ परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी युरोपीय लोकांच्या याच मानसिकतेला टोकदार उत्तर दिले होते- ''युरोपच्या समस्या या जगाच्या समस्या आहेत; पण जगाच्या समस्या या युरोपच्या समस्या नाहीत, या मानसिकतेतून युरोपीय सत्ताधारी आणि बुद्धिजीवी वर्गाने बाहेर पडले पाहिजे,'' असे स्पष्ट उद्गार जयशंकर यांनी भर पत्रकार परिषदेत काढून युरोपियनांची मतलबी आणि उच्चभ्रू मानसिकता उघड केली होती. काल नॉर्वेतील महिला पत्रकारानेही आपल्या अज्ञानमूलकतेतून स्वत:ची आणि त्या देशाची इभ्रत गमावली. नंतर आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत भारताच्या परराष्ट्र सचिवांनी या युरोपीय पत्रकारांचे भारताबद्दलचे आकलन आधुनिक करण्यासाठी अनेक उदाहरणे दिली. भारतात आज असंख्य वृत्तपत्रे आणि वृत्तवाहिन्या आहेत आणि त्यातून सर्व प्रकारची राजकीय मते व्यक्त होत असतात. त्यात सरकारवर उघडपणे टीका केली जाते. सरकारी निर्णयांना न्यायालयात आव्हानही दिले जाते. शिवाय, भारतात ९० कोटी 'स्मार्टफोन' असून, त्यावरील समाजमाध्यमांमध्येही सर्व प्रकारचे राजकीय विचार व्यक्त होत असतात. पण, विरोधी विचार व्यक्त करणाऱ्यांवर कारवाई केली जात नाही, हेही या सचिवांनी स्पष्ट केले. भारतावर का विश्वास ठेवायचा, या प्रश्नावर या सचिवांनी सडेतोड उत्तर देऊन या पत्रकाराचे तोंड बंद केले. ''कोविडच्या काळात भारताने या साथीवर लस निर्माणच केली असे नव्हे, तर ती शेकडो देशांना निर्यात करून त्या देशांनाही या साथीतून बाहेर पडण्यास मदत केली,'' असे सांगून ते म्हणाले की, ''यामुळे या देशांचा भारताबद्दल विश्वास वाढला आहे. जगभरातील अशांत व संघर्षमय देशांमध्ये शांतता प्रस्थापित करण्यासाठी संयुक्त राष्ट्रांकडून पाठविण्यात येणाऱ्या शांतता पथकांमध्ये भारतीय सैनिकांचा वाटा सर्वांत मोठा आहे. प्राचीन संस्कृती असलेल्या भारतात पूर्वापार लोकशाही मूल्ये रुजली आहेत. तसेच स्वातंत्र्यानंतर तत्काळ भारताने प्रौढ महिलांना मतदानाचा अधिकार प्रदान केला होता. अनेक प्रगत देशांनाही हा अधिकार बहाल करण्यासाठी अनेक दशके लागली होती,'' हेही त्यांनी नमूद केले. खरे म्हणजे परराष्ट्र सचिवांनी नंतर हेही सांगितले की, ''तुमच्याच देशाने भारताच्या पंतप्रधानांना नॉर्वेचा सर्वोच्च नागरी सन्मानही बहाल केला आहे.'' त्यामुळे या लिंबूटिंबू पत्रकाराचा नसला, तरी नॉर्वेच्या सरकारचा भारतावर भक्कम विश्वास आहे, हेच दिसून येते. भारतात मानवी हक्कांची पायमल्ली होते, असा आरोप आजवर चीन, पाकिस्तान आणि अमेरिका करीत होते. ही पायमल्ली विशेष करून काश्मीरमध्ये होत असते, असा त्यांचा रोख असतो. पण, अशा पायमल्लीचे एकही ठोस उदाहरण आजवर कोणत्याच देशाला सादर करता आलेले नाही. कारण, हे माहितीवजा आरोप हे कोणत्या तरी राजकीय अजेंड्याने प्रेरित असलेल्या 'एनजीओं'कडून, त्यांच्या दिशाभूल करणाऱ्या अहवालांतून केले जातात. उलट, पाकिस्तान व बांगलादेशात अल्पसंख्य असलेल्या हिंदूंवर राजरोस अत्याचार होत असले, तरी त्याबद्दल ही युरोपियन माध्यमे मौन बाळगतात. जो युरोप भारताला सहिष्णुतेचे धडे देतोय, त्या युरोपमध्ये मुस्लिमांच्या वाढत्या स्थलांतरितांच्या प्रवेशानंतर किती वेळा दंगली उसळल्या? नुकतीच ब्रिटनमध्ये इस्लामीकरणाविरोधात जनता मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरली. हे युरोपीय देशांना त्यांच्यावरील 'सांस्कृतिक आक्रमण वाटलेच की! ट्रम्प अध्यक्ष झाल्यापासून त्यांच्या यंत्रणांनी काही अमेरिकी नागरिकांवरच तपासाच्या नावाखाली हल्ले केले असून, त्यात सुमारे डझनभर निरपराध लोकांना आपला जीव गमवावा लागला. मानवी हक्कांच्या व्याख्येत या घटना बसत नाहीत, असा त्यांचा समज. जे बेकायदा अमेरिकेत राहतात, त्यांना त्यांच्या मायदेशी परत पाठविताना विमानातही हाता-पायांत बेड्या घातल्या जातात, हे कोणत्या मानवी हक्कांच्या व्याख्येत बसते? या महिला पत्रकाराने आपल्या उथळ बुद्धीने केवळ आपलीच नव्हे, तर आपल्या देशाची इभ्रतही गमावली एवढेच!

# खेडची विस्मृतीत गेलेली बुद्ध लेणी : इतिहास, उपेक्षा आणि संवर्धनाची हाक

खेड तालुक्यातील खोपी गावात मला प्रमुख वक्ता म्हणून निमंत्रित करण्यात आले होते. निमित्त होते तथागत, सम्राट असोक आणि बाबासाहेब यांची संयुक्त जयंती. कार्यक्रम संध्याकाळी सात वाजता असल्याने रात्री उशिरा परतीचा प्रवास टाळण्यासाठी त्या दिवशी गावात मुक्काम करण्याचा निर्णय घेतला. माझ्या भाषणात मी या गावाने आपल्या तालुक्यातील बौद्ध लेणी वारसा महत्त्व व संवर्धन आणि सुरक्षित करावा असे आवाहन केले. ओला गाडीने प्रवास करत असल्यामुळे सोबत माझे दोन विद्यार्थीही घेतले होते.



या प्रवासामागे आणखी एक महत्त्वाचा हेतू होता, दुसऱ्या दिवशी त्यांना खेड बुद्ध लेणी, महाड येथील चवदार तळे आणि गांधारपाले लेणी या विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष दाखवता यावीत. पुस्तकी इतिहासापेक्षा प्रत्यक्ष स्थळदर्शनातून विद्यार्थ्यांना प्राचीन भारताचा आणि महाराष्ट्राच्या गौरवशाली बौद्ध वारशाचा अधिक जिवंत अनुभव मिळतो, असा माझा नेहमीच प्रयत्न असतो. इतिहास केवळ वाचण्याची गोष्ट नसून तो अनुभवण्याची प्रक्रिया आहे. आणि म्हणूनच या प्रवासाला एक वेगळे ऐतिहासिक आणि शैक्षणिक महत्त्व लाभले.

१८ मे २०२६ रोजी खेड-चिपळूण येथील बस स्थानकाजवळ असलेल्या प्राचीन बुद्ध लेणी पाहता आली. खेडच्या गजबजलेल्या बस स्थानकाच्या अगदी जवळ असूनही अनेकांना या ऐतिहासिक वारशाची माहिती नसणे, हीच मोठी शोकांतिका वाटली. बस स्थानकाकडे पाठ करून उभे राहिल्यास समोर अनेक दुकाने दिसतात. त्या पलीकडे छोट्याशा टेकडीसारखा डोंगर आणि त्यावर लक्ष वेधून घेणारी मोठी पाण्याची टाकी दिसते. नेमक्या त्याच डोंगरावर या प्राचीन बौद्ध लेणी अस्तित्वात आहेत. दुकानांच्या मधील एका छोट्याशा गल्लीतून लेणीकडे जाणारी छोटीशी पायवाट आहे. फारशा उंचीवर या लेणी नाहीत. लेणींच्या पायथ्याशी दुकाने असून त्यामागे खेड शहराला पाणीपुरवठा करणारी यंत्रणा आहे. लेणीकडे चढत जाताना सर्वप्रथम उजव्या बाजूला दगडात कोरलेली दोन पाण्याची टाकी दिसतात. प्राचीन बौद्ध विहारांमध्ये पाण्याच्या व्यवस्थेला किती महत्त्व दिले जात होते, याची ही साक्ष आहे. त्यानंतर डाव्या बाजूला भिक्खूंना राहण्यासाठी कोरलेली एक खोली दिसते. थोडे पुढे डावीकडे गेल्यावर पुन्हा दोन दगडी निवास खोल्या दिसतात.

विशेष म्हणजे प्रत्येक खोलीत दगडात कोरलेली शयनव्यवस्था आजही स्पष्टपणे दिसून येते. दोन हजार वर्षांपूर्वीच्या भिक्खू जीवनातील साधेपणा आणि शिस्त याचे हे जिवंत उदाहरण आहे. सर्वात डावीकडील छोट्याशा भागात छोटासा विहार असून त्यामध्ये एक स्तूप आहे.

त्याला निळ्या रंगाच्या लोखंडी दांड्यांचा दरवाजा असून कडी आहे, मात्र कुलूप नाही. विशेष आनंदाची बाब म्हणजे हा स्तूप आजही तुलनेने चांगल्या स्थितीत असून त्याचा वरपर्यंत गेलेला 'हर्मिका'भाग स्पष्ट दिसून येतो. स्तूपाशेजारी एखाद्या उपासकाने ठेवलेली छोटीशी पितळी बुद्धमूर्ती देखील दिसली.

इतिहास अभ्यासकांच्या मते, ही लेणी साधारण इ.स.पूर्व दुसरे शतक ते इ.स. पहिले शतक या कालखंडातील असावीत. त्यांची रचना पाहता त्या प्रारंभीच्या थेरवाद बौद्ध परंपरेशी संबंधित असाव्यात, असे जाणवते. कारण येथे बुद्धमूर्ती नसून स्तूपाला केंद्रस्थानी स्थान आहे.

विशेष म्हणजे, खेड बस स्थानकाचा प्रचंड गजबजाट असूनही या लेणींवर इतर धर्मीय अतिक्रमण किंवा मोठ्या प्रमाणात विद्रूपीकरण झाल्याचे दिसून आले नाही. ही बाब निश्चितच सकारात्मक आणि दिलासा देणारी आहे.

परंतु दुसरीकडे, या स्थळाकडे होत असलेले दुर्लक्ष अत्यंत वेदनादायी आहे. सर्वत्र कचरा, अस्वच्छता आणि कोणतीही नीट संवर्धन व्यवस्था नसल्याचे दिसते. लेणीजवळ असलेला फलक पूर्णपणे गंजलेला असून त्यावर केवळ अर्धवट 'बुद्ध लेणी' असेच वाचायला मिळते. कुठेही स्पष्टपणे 'पुरातत्त्व विभाग' अथवा संवर्धनासंदर्भातील माहिती दिसून आली नाही.

इतका महत्त्वाचा बौद्ध वारसा बस स्थानकाच्या शेजारी उभा आहे.परंतु त्याच्या संरक्षणासाठी ठोस प्रयत्न दिसत नाहीत, ही खंत मनाला लागून राहते. या भेटीत मनाला विशेष स्पर्शून गेलेली गोष्ट म्हणजे वाई येथील युवा लेणी संवर्धक चिराग मोरे याची भेट. तो खेड येथील योगिता डेंटल कॉलेजमध्ये तृतीय वर्षाचा विद्यार्थी आहे. विशेष म्हणजे, त्याच दिवशी सकाळी दहा वाजता त्याची परीक्षा होती; तरीदेखील सकाळी सात वाजताच तो आम्हाला ही लेणी दाखवण्यासाठी उपस्थित होता.


प्राचीन बौद्ध वारशाप्रती असलेली त्याची तळमळ, अभ्यासू वृत्ती आणि संवर्धनाची जाणीव याचे खास उदाहरण होते. आज अनेक युवक मोबाईल आणि सोशल मीडियाच्या आभासी जगात हरवत चालले आहेत. अशा वेळी एक तरुण स्वतःच्या अभ्यासासोबत इतिहास, बौद्ध वारसा आणि लेणी संवर्धनासाठी वेळ देतो, ही बाब खरोखरच अत्यंत आशादायक आहे. अशा तरुणांमुळेच महाराष्ट्राचा प्राचीन वारसा भविष्यात जिवंत राहील, अशी आशा निर्माण होते. खेड तालुका पातळीवर इतिहासप्रेमी, लेणी संवर्धक आणि स्थानिक प्रशासन यांनी याकडे तातडीने लक्ष देणे आवश्यक आहे.

तसेच भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाने या लेणी संवर्धनासाठी ठोस पावले उचलणे गरजेचे आहे. कारण ही लेणी केवळ दगडात कोरलेली जागा नाहीत, तर महाराष्ट्राच्या प्राचीन बौद्ध इतिहासाची शांत पण अत्यंत मौल्यवान साक्ष आहेत.

------------------



प्रा. डॉ. छाया मित्तर
(निवृत्त प्राचार्या )
९७७३४१५४६९




## साहित्यिक उत्तमराव तरकसे यांच्या 'करपली भाकर'ला वैशाखी वादळ वारा चा पुरस्कार जाहीर

ग्रामीण साहित्य क्षेत्रातील मानाचा व प्रतिष्ठाचा समजले जाणारा वैशाखी वादळवारा या संस्थेच्या वतीने दिले जाणारा सुरेश रामलिंग मिटकरी स्मृती कथा गौरव राज्यस्तरीय साहित्य २०२६ चा उत्कृष्ट वाङ्मय कथा संग्रह विभागाचा पुरस्कार नवी मुंबई येथील खाकी वर्दीतील ग्रामीण दर्दी साहित्यिक मा उत्तमराव तरकसे असरडोहकर यांच्या करपली भाकर या कथासंग्रहाला मिळाल्याचे संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत जोगदंड यांनी जाहीर केले

करपली भाकर या कथासंग्रहाला राज्य शासनाच्या यशदा प्रशिक्षण संस्था पुणे व पुणे महानगरपालिका मराठी भाषा संवर्धन विभाग यांच्या वतीने पहिला पुरस्कार मिळाला तसेच दुसरा पुरस्कार लोककलावंत साहित्य परिषद महाराष्ट्र राज्य वडाळा महादेव तालुका श्रीरामपूर जिल्हा अहिल्यानगर या संस्थेच्या वतीने साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे पुरस्कार २०२६ मिळाला तसेच तिसरा पुरस्कार ज्येष्ठ साहित्यिक प्रा रसूल सोलापुरे बहुउद्देशीय संस्था महागाव या संस्थेच्या वतीने मिळाला व आत्ता चौथा पुरस्कार वैशाखी वादळ वारा या संस्थेच्या वतीने सुरेश रामलिंग मिटकरी उत्कृष्ट वाङ्मय पुरस्कार २०२६ मिळाल्याचे संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत जोगदंड यांनी जाहीर केले

सदरचा पुरस्कार हा लवकरच म्हणजे रविवार दिनांक ७ जून २०२६ रोजी एस एम जोशी फाउंडेशन पत्रकार भवन शेजारी गांजवे चौक नवी पेठ पुणे येथे ग्रामीण साहित्यिक समाजभूषण उत्तमराव तरकसे यांना मान्यवराच्या हस्ते सन्मानपूर्वक प्रदान करण्यात येणार आहे असे सदर संस्थेच्या वतीने साहित्यिक उत्तम तरकसे यांना अभिनंदन पत्राच्या माध्यमातून व दै वृत्तपत्र व सामाजिक प्रसार माध्यमातून जाहीर करण्यात आल्याने ग्रामीण साहित्यिक उत्तमराव तरकसे यांनी सदर संस्थेचे व संस्था पदाधिकारी तसेच निवड समितीचे सदरचा पुरस्कार करिता ''करपली भाकर'' या कथासंग्रहा ची निवड केल्याबद्दल सर्वांचे खूप खूप मनापासून आभार मानले आहेत

# स्मशानभूमीने जागवला धार्मिक एकोपा...

## जीवनाचा अंत,माणुसकी जिवंत !, परस्परांच्या श्रद्धांचा सन्मान करत तीन धर्मीय कुटुंबीयांनी दिला मानवतेचा संदेश

सध्या समाजामध्ये धर्म,जात,पंथ आणि विचारांच्या नावावर दुभंग वाढत असल्याच्या चर्चा सातत्याने होत असतात.सोशल मीडियाच्या गदारोळात तणावाच्या बातम्या झळकत असताना वाशीमच्या पद्मतीर्थ मोक्षधामात दि.१८ मे रोजी घडलेला प्रसंग मात्र समाजमनाला आश्वस्त करणारा ठरला. माणुसकी अजूनही जिवंत आहे, परधर्माचा आदर अजूनही समाजाच्या मनामनात रुजलेला आहे आणि भारतीय संस्कृतीतील ''सर्वधर्म समभाव'' ही केवळ पुस्तकातील संकल्पना नसून प्रत्यक्ष कृतीतूनही जगली जाते, याचे प्रेरणादायी उदाहरण या घटनेतून पाहायला मिळाले.

सोमवारी सकाळी सुमारे ११.३० वाजताच्या सुमारास स्थानिक पद्मतीर्थ मोक्षधाम येथे अंत्यसंस्कारासाठी एकाच वेळी तीन पार्थिव दाखल झाले. कडाक्याचे ऊन,अंगाची लाही लाही करणारे तापमान आणि असह्य उकाडा अशा वातावरणातही स्मशानभूमीत जमलेल्या लोकांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच शांततेचा आणि समंजसपणाचा भाव दिसत होता.अल्लाडा प्लॉट परिसरातील स्व.शिलाबाई परमेश्वर अंभोरे (वय ५६), नगीना मस्जिद परिसरातील स्व. शांताबाई विष्णू भिसडे (वय ८५) आणि चामुंडा देवी मंदिर परिसरातील स्व. प्रकाश कुंडलिक पुरी (वय ६०) यांच्या पार्थिवांवर अंत्यसंस्कारासाठी त्यांचे आप्तस्वकीय आणि नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्व.शिलाबाई अंभोरे आणि स्व. शांताबाई भिसडे यांचे सरण एकाच शेडमध्ये रचण्यात आले होते, तर स्व. प्रकाश पुरी यांच्यावर त्यांच्या धार्मिक परंपरेनुसार नदीपलीकडील भागात दफनविधीची तयारी सुरू होती. तिन्ही कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळलेला असतानाही त्या वातावरणात एक विलक्षण संवेदनशीलता आणि परस्पर सन्मानाचे दर्शन घडत होते.

यावेळी स्व.शिलाबाई अंभोरे यांच्या अंत्यसंस्कारापूर्वी बौद्ध धर्माच्या परंपरेनुसार पंचशील आणि त्रिशरणाचे पठण सुरू होते. गंभीर वातावरणात सुरू असलेले हे पठण म्हणजे केवळ



धार्मिक विधी नव्हते,तर शांतता, करुणा आणि समतेचा संदेश देणारे शब्द होते. ही विधी पूर्ण होण्यासाठी काही वेळ लागणार असल्याचे लक्षात आल्यानंतर शेजारीच अंत्यसंस्कारासाठी पूर्ण तयारी झालेल्या स्व.शांताबाई भिसडे यांच्या नातेवाईकांनी अत्यंत समंजस भूमिका घेतली.

''जोपर्यंत पंचशील आणि त्रिशरण पूर्ण होत नाही, तोपर्यंत आपण थांबूया,'' असा निर्णय त्यांनी स्वयंस्फूर्तीने घेतला. विशेष म्हणजे, नदीपलीकडे दफनविधीची तयारी सुरू असलेल्या स्व. प्रकाश पुरी यांच्या आप्तस्वकीयांनीही याच मानवतावादी भावनेतून आपल्या धार्मिक विधींना काही काळ विराम दिला.त्या क्षणी तेथे धर्म नव्हते,पंथ नव्हते, श्रेष्ठ-कनिष्ठ भेद नव्हते, होती ती फक्त एकच भावना,समोरच्या व्यक्तीच्या श्रद्धेचा आदर.काही वेळाने पंचशील आणि त्रिशरणाचे पठण पूर्ण झाले आणि त्यानंतर दोन्ही सरणांना एकाच वेळी चिंताग्नी देण्यात आला.

त्याचवेळी स्व. प्रकाश पुरी यांच्यावरही अंत्यसंस्कार करण्यात आले. दुःखाने भरलेल्या त्या वातावरणातही उपस्थितांच्या मनात समाधानाची एक शांत लहर उमटत होती.कारण त्यांनी या दिवशी केवळ अंत्यसंस्कार पाहिले नव्हते, तर मानवतेचा उत्सव अनुभवला होता.आजच्या ध्रुवीकरणाच्या काळात छोटी छोटी कारणे पुढे करून समाजात द्वेषाची बीजे पेरली जातात.धर्माच्या नावावर माणूस माणसापासून दूर नेण्याचे प्रयत्न होतात.अशा काळात वाशीमच्या पद्मतीर्थ मोक्षधामात घडलेला हा प्रसंग म्हणजे समाजाला दिशा देणारा दीपस्तंभ ठरावा असा आहे. भारतीय संस्कृतीची खरी ताकद ही विविधतेतील ऐक्यात आहे.माझा धर्म श्रेष्ठ,असे सांगण्यापेक्षा तुझ्या धर्माचाही मला तितकाच आदर आहे,ही भावना अधिक मोठी असते.पद्मतीर्थ मोक्षधामातील या घटनेने नेमका हाच संदेश समाजासमोर प्रभावीपणे ठेवला.स्मशानभूमी हे अंतिम सत्याचे स्थान मानले जाते. तेथे माणसाची ओळख संपत्ती, पद,जात किंवा धर्माने होत नाही;तर तो फक्त माणूस म्हणून उरतो.रविवारी या स्मशानभूमीत घडलेला प्रसंग याच जीवन तत्त्वज्ञानाला अधोरेखित करणारा ठरला.धर्म वेगळे असले तरी दुःख एकच असते,अश्रूंचा रंग एकच असतो आणि माणुसकीची भाषा देखील एकच असते,हे या दिवशी पद्मतीर्थ मोक्षधाम ने संपूर्ण समाजाला शिकवून दिले.

**आतिश देशमुख/ वाशीम**

## विविध वृत्त...

### मेलोडी टू मेलोनी: पंतप्रधान मोदींच्या खास भेटीने जिंकली मने

रोम : पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांची भेट नेहमीच इंटरनेटवर आणि आंतरराष्ट्रीय राजकारणात चर्चेचा विषय असते. आता पुन्हा एकदा या दोन नेत्यांच्या भेटीने आणि एका अत्यंत गोड 'गिफ्ट'ने सोशल मीडियावर तुफान धुमाकूळ घातला आहे. पंतप्रधान मोदींनी इटलीच्या पंतप्रधान मेलोनी यांना चक्क 'मेलोडी' चॉकलेट्सची भेट दिली असून या भेटीचा व्हिडिओ सध्या इंटरनेटवर वेगाने व्हायरल होत आहे. इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांनी बुधवारी त्यांच्या अधिकृत सोशल मीडिया अकाऊंटवरून पंतप्रधान मोदींसोबतचा एक हलकाफुलका आणि मजेशीर व्हिडिओ शेअर केला. या व्हिडिओला त्यांनी ''ऊप्रहवब ब्दलब षदी.प्.ग्षू'' (भेटीबद्दल धन्यवाद) असे कॅप्शन दिले आहे. या व्हिडिओमध्ये मेलोनी अत्यंत आनंदाने आणि हसत हसत सांगत आहेत की, ''पंतप्रधान मोदींनी मला एक खूप छान भेट दिली आहे, एक अतिशय उत्तम टॉफी - मेलोडी.'' मेलोनी यांचे हे वाक्य ऐकताच त्यांच्या शेजारी उभे असलेले पंतप्रधान मोदी देखील खळखळून हसताना दिसत आहेत.

व्हिडिओच्या शेवटी दोन्ही नेते अत्यंत मैत्रीपूर्ण वातावरणात हसताना पाहायला मिळतात.

गेल्या काही महिन्यांपासून इंटरनेटवर 'शत्द्ग' हा हॅशटॅग प्रचंड ट्रेंड होत आहे. 'मोदी' आणि 'मेलोनी' या दोन नावांचे एकत्रीकरण करून नेटकऱ्यांनी हा 'शत्द्ग' शब्द तयार केला आहे. जेव्हा-जेव्हा हे दोन्ही नेते आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर भेटतात, तेव्हा इंटरनेटवर त्यांच्या मैत्रीपूर्ण भेटीचे मीम्स आणि व्हिडिओ व्हायरल होतात. विशेष म्हणजे, या दोन्ही जागतिक नेत्यांना या 'शत्द्ग' ट्रेंडची कल्पना आहे आणि त्यांनी यापूर्वीही याला सकारात्मक दाद दिली आहे. आता थेट 'मेलोडी' चॉकलेट्स भेट देऊन मोदींनी या व्हायरल ट्रेंडला एक प्रकारे खऱ्याखुऱ्या गोडव्यात बदलले आहे.मेलोनी यांनी हा व्हिडिओ पोस्ट करताच जगभरातील, विशेषत: भारतीय नेटकऱ्यांनी यावर प्रतिक्रियांचा पाऊस पाडला आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावरील राजकारणात असा निखळ आणि मैत्रीपूर्ण संवाद क्वचितच पाहायला मिळतो, असे मत अनेक युजर्स व्यक्त करत आहेत.यापूर्वी दुबईमध्ये झालेल्या हवामान परिषदेदरम्यान मेलोनी यांनी पंतप्रधान मोदींसोबत एक सेल्फी शेअर केला होता. त्याला त्यांनी तो सेल्फी देखील इंटरनेटवर प्रचंड गाजला होता. आता या नव्या 'मेलोडी टॉफी'च्या व्हिडिओने त्या आठवणींना पुन्हा एकदा उजाळा दिला आहे. राजकीय तणाव आणि जागतिक घडामोडींच्या गराड्यात, दोन देशांच्या प्रमुखांमधील हा खेळीमेळीचा क्षण सर्वांच्या चेहऱ्यावर हसू आणत आहे.

### एआय आणि डिजिटल नवोपक्रमातून महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेला नवी गती, टेक महाइम्पॅक्ट २०२६' परिषदेच्या परिसंवादात तज्ज्ञांचे मत

**मुंबई/प्रतिनिधी :** कृत्रिम बुद्धिमत्ता (), ई-गव्हर्नन्स आणि डिजिटल नवोपक्रमाच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेला अधिक गती देण्यावर भर देत प्रशासन अधिक पारदर्शक, उत्तरदायी आणि नागरिकाभिमुख करण्याचा निर्धार राज्य शासनाने व्यक्त केला. 'पॉवरिंग महाराष्ट्राज इकॉनॉमी थ्रू एआय, ई-गव्हर्नन्स अँड डिजिटल इनोव्हेशन' या विषयावरील परिसंवादात विविध क्षेत्रातील तज्ज्ञांनी डिजिटल परिवर्तनाच्या संधी आणि आव्हानांवर सखोल चर्चा केली.

तंत्रज्ञान, नवोपक्रम, डिजिटल गव्हर्नन्स व सीएसआर विषयक उच्चस्तरीय 'टेक महाइम्पॅक्ट २०२६' परिषदेत ''एआय, ई-गव्हर्नन्स आणि डिजिटल इनोव्हेशनच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेला गती'' या विषयावरील पहिल्या चर्चासत्रात डॉ.ज्ञानेश्वर मुळे, भुवनेश्वरी एस, अजय प्रसाद श्रीवास्तव, अभिषेक लाहिरी, के.वेंकटेशम, अवर्तन बोकील आणि भगवान पाटील या मान्यवरांनी सहभाग घेतला.

या परिसंवादात राज्य शासनाच्या इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाच्या आयुक्त भुवनेश्वरी एस. यांनी सांगितले की, शासन केवळ कागदपत्रांचे डिजिटायझेशन करत नसून संपूर्ण प्रशासकीय प्रक्रियेचे डिजिटलायझेशन आणि 'गव्हर्नमेंट प्रोसेस री-इंजिनिअरिंग'वर काम करत आहे. विविध विभागांचे डेटाबेस 'एपीआय इंटिग्रेशन'द्वारे परस्पर जोडण्याचे काम सुरू असून त्यामुळे नागरिकांना सेवा मिळविण्याची प्रक्रिया अधिक सुलभ होणार आहे. तसेच एआय ॲनालिटिक्सच्या मदतीने समस्या उद्भवण्यापूर्वीच त्यांचा अंदाज घेऊन डेटा-आधारित निर्णयप्रक्रिया मजबूत करण्याचे उद्दिष्ट असल्याचे त्यांनी नमूद केले.

डॉ.ज्ञानेश्वर मुळे फाउंडेशनचे संस्थापक तथा माजी आयएफएस अधिकारी ज्ञानेश्वर मुळे यांनी तंत्रज्ञानाचा वापर करण्यापूर्वी समस्येचे अचूक विश्लेषण आवश्यक असल्याचे सांगितले. दिल्लीतील पासपोर्ट सेवा सुलभीकरणाचे उदाहरण देत त्यांनी तंत्रज्ञानाचा उद्देश नागरिकांचे जीवन अधिक सुलभ करणे हा असावा, असे स्पष्ट केले. सीएसआर २.० च्या माध्यमातून तंत्रज्ञानाचा उपयोग केवळ यंत्रणा सुधारण्यासाठी नव्हे, तर सामाजिक परिवर्तनासाठी आणि शेवटच्या घटकापर्यंत लाभ पोहोचवण्यासाठी व्हायला हवा, असेही त्यांनी सांगितले.

बृहस्पती टेक्नॉलॉजीज लिमिटेडचे संचालक तथा माजी पोलीस अधिकारी के. व्यंकटेशम यांनी शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रात एआयमुळे मोठे बदल घडून येतील, असे सांगितले. विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक गरजांनुसार एआयच्या साहाय्याने शैक्षणिक व्हिडिओ आणि ग्राफिक्स तयार करता येतील, असे त्यांनी नमूद केले.


एसटीपीआय पुणेचे संचालक अजय प्रसाद श्रीवास्तव यांनी कृषी क्षेत्रातील एआयच्या वापराची माहिती देताना साखर उद्योगासाठी विकसित करण्यात आलेल्या ॲपचा उल्लेख केला. हे ॲप एआयच्या मदतीने ऊस काढणीची योग्य वेळ निश्चित करते. त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान कमी होण्यास मदत होत असून साखर कारखान्यांवरील गर्दीचे नियोजनही सुलभ होत असल्याचे त्यांनी सांगितले.

आयर्न माउंटन इंडियाचे चीफ ऑफ ग्रोथ बिझनेस अभिषेक लहिरी यांनी शासकीय योजनांमध्ये एआयचा वापर करताना पारदर्शकता, निष्पक्षता आणि उत्तरदायित्व महत्त्वाचे असल्याचे सांगितले.

# शिक्षक कॉलनी येथे १ कोटी रुपये खर्चाच्या अत्याधुनिक 'नमो उद्याना'चे दिमाखात उद्घाटन!

## स्व.लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब नमो उद्यान असे होणार नामकरण-इनामदार व बनसोड





**केज/प्रतिनिधी :** केज शहरातील नागरिकांसाठी एक आनंदाची आणि हक्काच्या विरंगुळ्याची बातमी आहे. या भागातील २३ गुंठे ओपन स्पेस (खुली जागा) मध्ये तब्बल १ कोटी रुपये खर्च करून साकारण्यात येत असलेल्या अत्याधुनिक नमो उद्यानाचे भव्य उद्घाटन नगराध्यक्षा सौ. सीताताई बनसोड व गटनेते हारुणभाई इनामदार यांच्या सह उपस्थित मान्यवरांच्या हस्ते स दि.२० मे २०२६ रोजी अत्यंत उत्साही वातावरणात संपन्न झाले.

या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस अजित दादा पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा गटनेते हारूणभाई इनामदार, नगराध्यक्षा सौ. सिताताई बनसोड, नगरसेविका पद्मिनी आक्का शिंदे, नगरसेवक बाळासाहेब गाढवे यांच्यासह शहरातील अनेक मान्यवर व या भागातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे साहेबांचे नाव देणार असे या कार्यक्रमादरम्यान बोलताना ज्येष्ठ नेते हारूणभाई इनामदार यांनी महत्त्वाची घोषणा केली.

शिक्षक कॉलनीतील या नमो उद्यानास ''स्वर्गीय लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब नमो उद्यान'' असे नाव देण्यात येत असल्याचे त्यांनी जाहीर केले. या नामकरणामुळे परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

कामाच्या दर्जाबाबत तडजोड नाही: नगराध्यक्षा सौ .सिताताई बनसोड

नगराध्यक्षा सौ. सिताताई बनसोड यांनी उपस्थित नागरिकांना संबोधित करताना सांगितले की, ''शिक्षक कॉलनी भागाचा विकास व नागरिकांना उत्तम सोयी-सुविधा देणे हे आपले प्राधान्य आहे आज रोजी पर्यंत या भागातील अनेक रस्त्यांची कामे करण्यात आलेले आहेत उर्वरित रस्त्यांची व नालीचे कामे लवकरच पूर्ण करणार आहोत. या उद्यानाचे काम पूर्णपणे अत्याधुनिक आणि दर्जेदार दर्जाचे केले जाईल,'' अशी ग्वाही त्यांनी दिली.

मान्यवरांची लक्षणीय उपस्थिती

या उद्घाटन प्रसंगी विविध क्षेत्रातील मान्यवरांनी हजेरी लावली होती.

यामध्ये प्रामुख्याने: दैनिक लोकमतचे केज तालुका प्रतिनिधी ज्येष्ठ पत्रकार मधुकर शिरसट, पत्रकार प्रकाश मुंडे, पत्रकार तात्या गवळी,शिक्षण व प्रशासकीय क्षेत्र: एम. डी. घुले सर, अंधारे सर, कराड साहेब, मेजर धीवार साहेब, इंजिनिअर इनामदार साहेब,प्रमुख नागरिक व कार्यकर्ते: शेख खय्युम, मयूर टकले, विकास बिक्कड, धीवार मामा, आमेर इनामदार,रोडे भैया तसेच गुत्तेदार केंद्रे आणि केज नगरपंचायतीचे कर्मचारी उपस्थित होते.

आभार प्रदर्शन: कार्यक्रमाचा समारोप अत्यंत सोहळेपूर्वक झाला. उपस्थित सर्व मान्यवरांचे आणि नागरिकांचे आभार एम. डी. घुले सर यांनी मानले. या उद्यानामुळे शिक्षक कॉलनी परिसराच्या सौंदर्यात भर पडणार असून बालकांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांसाठीच हे उद्यान एक उत्तम केंद्र ठरणार आहे. केजच्या वैभवात आणखी एक भर पडणार असून दर्जेदार व अत्याधुनिक सुविधांचे स्व. लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब नमो उद्या तीन महिन्यात पूर्ण होऊन त्याचे लोकार्पण करण्यात येईल. या उद्यानाचा फायदा केज शहरासह तालुक्यातील नागरिकांना होणार आहे. या उद्यानाचे काम हे अत्यंत नियोजन पद्धतीने व दर्जेदार क्वालिटीचे होणार आहे यामध्ये कसलेही प्रकारची तोडजोड केली जाणार नाही अथवा हायगय होणार नाही. आम्ही केज वासियांना दिलेल्या शब्दाच्या वचनपूर्ती कडे वाटचाल करत आहोत गटनेते हारुणभाई इनामदार.

## शिर्डीत तामिळनाडूच्या साईभक्त महिलेला लुटलं; दुचाकीस्वाराने क्षणार्धात ८ तोळ्याची सोन्याची चैन पळवली


**शिर्डी/प्रतिनिधी :** येथील म्हाळोबा मंदिर परिसरातील मुख्य आणि नेहमी वर्दळीच्या रस्त्यावर एका साईभक्त महिलेच्या गळ्यातील तब्बल ८ तोळ्यांची सोन्याची चैन अज्ञात चोरट्यानं हिसकावून नेल्याची धक्कादायक घटना घडली आहे. ही घटना मंगळवारी (१९ मे) रात्रीच्या सुमारास घडली असून, प्रकारानंतर परिसरात एकच खळबळ उडाली आहे. गर्दीच्या ठिकाणी झालेल्या या चोरीमुळे नागरिक आणि भाविकांमध्ये चिंतेचं वातावरण निर्माण झालं आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला आहे. या प्रकारामुळे शिर्डीतील नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.मिळालेल्या माहितीनुसार, तामिळनाडूच्या कोइम्बतूर येथील शिला या आपल्या कुटुंबासह साईबाबांच्या दर्शनासाठी शिर्डीत आल्या होत्या. दर्शनानंतर त्या कुटुंबीयांसोबत खरेदीसाठी बाहेर पडल्या. त्यांच्या ग्रुपमधील काही सदस्य पुढे खरेदी करत असताना शिला या आपल्या पतीसोबत रस्त्यावरून पायी जात होत्या. याच दरम्यान पाठीम ागून दुचाकीवर आलेल्या एका अज्ञात व्यक्तीनं त्यांना पत्ता विचारण्याच्या बहाण्यानं थांबवलं. महिलेनं प्रतिसाद देताच चोरट्यानं क्षणार्धात त्यांच्या गळ्यातील सोन्याची साखळी जोरात हिसकावून घेतली. आरोपीने चेहरा लपवण्यासाठी हेल्मेट घातल्यानं त्याचा चेहरा स्पष्ट दिसू शकला नाही. अत्यंत वेगाने आलेल्या या चोरट्यानं काही सेकंदांतच चोरी करून घटनास्थळावरून पळ काढला.

या घटनेत सुमारे ८० ग्रॅम वजनाची, म्हणजेच अंदाजे ८ तोळ्यांची सोन्याची चैन चोरीला गेली आहे. बाजारभावानुसार या दागिन्याची किंमत लाखो रुपयांच्या घरात असल्याची माहिती नातेवाईकांनी दिली. भर गर्दीत आणि कुटुंबीयांसमोर घडलेल्या या प्रकारामुळे संबंधित महिला घाबरून गेल्या असून त्यांना अश्रू अनावर झाले.

पोलिसांनी काय सांगितलं? : घटनेची माहिती मिळताच कुटुंबीयांनी तत्काळ पोलिसांशी संपर्क साधला. माहिती मिळाल्यानंतर पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून, त्यांनी महिलेची सविस्तर माहिती घेत तपास सुरू केला. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासून आरोपीचा माग काढण्याचे काम सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली. या प्रकरणी भाविकानं शिर्डी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. शिर्डी पोलिसांनी अज्ञात इसमान विरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू असल्याची माहिती शिर्डी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रणजित गलांडे यांनी दिली आहे.

नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण : दरम्यान, या घटनेनंतर स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निम र्ण झाले आहे. विशेषत: रात्रीच्या वेळी शहरातील गर्दीच्या भागात पोलिस गस्त वाढवण्याची मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. हेल्मेट आणि मास्क घालून संशयास्पद हालचाली करणाऱ्या दुचाकीस्वारांवर पोलिसांनी कडक नजर ठेवावी, अशी मागणीही स्थानिकांनी केली आहे.

## हृदयद्रावक! पुण्यातील सोसायटीत लिफ्टमध्ये अडकून खेळता-खेळता ७ वर्षांच्या चिमुकल्याचा मृत्यू



**पुणे/प्रतिनिधी :** पुण्यातून एक अत्यंत धक्कादायक बातमी समोर आली आहे. सिंहगड रस्ता परिसरातील एका सोसायटीमध्ये खेळण्यात मग्न असलेल्या एका सात वर्षांच्या निरागस बालकाचा लिफ्टमध्ये अडकून दुर्दैवी मृत्यू झाला आहे. सोमवारच्या रात्री घडलेल्या या थरारक घटनेने संपूर्ण पुणे शहरात शोककळा पसरली असून, बहुमजली इमारतींमध्ये राहणाऱ्या पालकांच्या चिंतेत मोठी भर पडली आहे.

नेमका थरार कसा घडला?

ही दुर्दैवी घटना सिंहगड रोडवरील निंबजनगर येथील 'रिद्धी सिद्धी अपार्टमेंट'मध्ये घडली. शिवांश शैलेश धूत (वय ७ वर्षे) असे या मृत पावलेल्या दुर्दैवी बालकाचे नाव आहे. रोजच्याप्रमाणे सोमवारी रात्री दहा वाजण्याच्या सुमारास शिवांश सोसायटीच्या आवारात आपल्या मि त्रांसोबत खेळत होता. खेळण्याच्या नादात तो एकटाच लिफ्टमध्ये शिरला. त्याने वरच्या मजल्यावर जाण्यासाठी बटण दाबले आणि लिफ्ट सुरूही झाली. मात्र, दुसऱ्या मजल्यापर्यंत पोहोचण्याआधीच ही लिफ्ट अचानक दोन मजल्यांच्या मध्येच बंद पडून अडकली. इकडे शिवांश बराच वेळ उलटूनही खेळून परतला नसल्याने कुटुंबीय आणि शेजाऱ्यांनी त्याची शोधाशोध सुरू केली. तो कुठेच न दिसल्याने अखेर त्यांचा मोर्चा लिफ्टकडे गेला आणि तिथेच काहीतरी अघटित घडल्याचा संशय रहिवाशांना आला.

घटनेचे गांभीर्य ओळखून रहिवाशांनी तातडीने रात्री साडेअकराच्या सुमारास पोलीस आणि अग्निशमन दलाला पाचारण केले. माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या जवानांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत बचावकार्य सुरू केले. शर्थीचे प्रयत्न करून आणि तांत्रिक बाबी हाताळून जवानांनी लिफ्टचे दरवाजे उघडले व शिवांशला बाहेर काढले. पण दुर्दैवाने तोवर खूप उशीर झाला होता. आत अडकल्यामुळे या चिमुकल्याने आपला जीव सोडला होता. अवघ्या सात वर्षांच्या हसऱ्या-खेळत्या म ुलाचा असा अचानक आणि भयंकर मृत्यू झाल्याने सोसायटीच्या आवारात कुटुंबीयांनी एकच टाहो फोडला.या हृदयद्रावक घटनेनंतर सिंहगड रोड पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून अकस्मात मृत्यूची (अऊ) नोंद केली आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक विनय पाटणकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, पोलीस या संपूर्ण प्रकरणाचा सखोल तपास करत आहेत. आश्चर्याची बाब म्हणजे, प्राथमिक तपासात लिफ्टमध्ये कोणताही मोठा तांत्रिक बिघाड आढळलेला नाही. तसेच, सोसायटीकडून या लिफ्टचे वेळोवेळी ऑडिट व नियमित देखभाल (श्रग्हूहरहम) केली जात असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. लिफ्ट व्यवस्थित होती तर अचानक ती मध्येच कशी थांबली? यामागे काही अज्ञात तांत्रिक त्रुटी होती की आणखी काही कारण? या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचे आव्हान आता पोलिसांसम ोर आहे. या एका घटनेने पुन्हा एकदा उंच इमारतींमधील लिफ्टच्या सुरक्षेचा आणि लहान मुलांच्या सुरक्षिततेचा अत्यंत गंभीर प्रश्न उभा केला आहे.

## डावखरे कुटुंबात फूट, निरंजन डावखरेंच्या मोठ्या भावाचा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश

**मुंबई/प्रतिनिधी :** भाजपचे नेते आणि निरंजन डावखरे यांचे मोठे बंधू प्रबोध डावखरे यांनी एक मोठा राजकीय निर्णय घेतला आहे. प्रबोध डावखरे यांनी बुधवारी म ुंबईतील कार्यक्रमात राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. राष्ट्रवादी काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्यांच्या उपस्थितीत प्रबोध डावखरे यांच्या पक्षप्रवेशाचा सोहळा पार पडला. यावेळी सुनील तटकरे, मंत्री छगन भुजबळ, माजी मंत्री दिलीप वळसे पाटील उपस्थित होते. प्रबोध डावखरे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केल्याने डावखरे कुटुंबात राजकीय फूट पडल्याचे बोलले जात आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्यांनी प्रबोध डावखरे यांचे पक्षात स्वागत केले.

पक्ष वाढीसाठी आम्ही प्रयत्न करत असतो. वसंत डावखरे आजात शत्रू होते. कुठेही शत्रुत्वाची भावना नव्हती. त्यांचे चिरंजीव प्रबोध डावखरे आज आपल्या पक्षात येत आहेत. प्रबोध आणि त्यांचे कार्यकर्ते प्रवेशासाठी आले आहेत. ते उत्तम व्यावसायिक आहे. त्यांच्या जिम आहेत आणि आता ते सोबत येत आहेत. या पक्षात चांगली वागणूक मिळेल कुठेही कमी जास्त अशी वागणूक असणार नाही. ते मजबुतीने काम करतील. ज्या अडचणी असतील त्या सांगत चला, असे छगन भुजबळ यांनी म्हटले.

प्रबोध वसंतराव डावखरे यांनी आज राष्ट्रवादीत प्रवेश केला आहे. पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवार यांच्यावतीने स्वागत करतो. प्रबोध डावखरे हे व्यावसायिक आहेत. महाराष्ट्राच्या विविध भागात ३० जिम ते चालवतात. त्यांच्या वडिलांच्या विचाराचा धागा पकडून आता ते पुढे जात आहेत. डावखरे यांचं गाव शिरूर तालुक्यातील हिवरे हे गाव आहे. तत्कालीन मंत्री बाळासाहेब देसाई यांचे स्वीय सहायक म्हणून त्यांनी काम केलं होतं. विधान परिषद उपसभापती म्हणून देखील त्यांनी काम केलं.

# शरद पवारांनी बोलावलेल्या बैठकीला रोहित पवारांची दांडी

**मुंबई/प्रतिनिधी :** सत्ताधारी राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे आणि राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांनी नुकतीच शरद पवार यांची घेतलेली भेट आणि त्यानंतर पवारांनी केलेल्या त्यांच्या कौतुकामुळे आमदार रोहित पवार कमालीचे नाराज असल्याची जोरदार चर्चा राजकीय वतुर्ळात सुरू झाली आहे. या नाराजीनाट्यातूनच रोहित पवार यांनी बुधवारी मुंबईतील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे शरद पवारांनी बोलावलेल्या पक्षाच्या अत्यंत महत्त्वाच्या बैठकीला दांडी मारल्याचे समोर आले आहे. ते सध्या पुण्यात असून त्यांनी या बैठकीकडे पाठ फिरवल्याने राजकीय तर्कवितर्कांना उधाण आले आहे.

सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसच्या नुकत्याच जाहीर झालेल्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या यादीतून प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे यांच्या पदांचा उल्लेख जाणीवपूर्वक टाळल्याचे चित्र निम र्ण झाले होते. यामुळे नाराज असलेल्या या दोन्ही नेत्यांनी दोन दिवसांपूर्वी शरद पवारांची भेट घेऊन आपली व्यथा मांडली होती. शरद पवार गटाकडून, विशेषत: आमदार रोहित पवारांकडून तटकरे आणि पटेल यांच्यावर सातत्याने जोरदार तोंडसूख घेतले जाते. असे असतानाही शरद पवारांनी या दोन्ही नेत्यांची भेट घेतली आणि माध्यमांसमोर ''सुनील तटकरे व प्रफुल्ल पटेल हे दोन्ही अत्यंत क्षमतावान नेते आहेत,'' अशा शब्दांत त्यांची प्रशंसा केली. पवारांनी केलेले हे कौतुक रोहित पवारांच्या जिव्हारी लागल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित ही बैठक विधान परिषद निवडणुका आणि आगामी काळातील पक्षाच्या धोरणात्मक रणनीतीसाठी अत्यंत महत्त्वाची मानली जात होती. मात्र, रोहित पवार यांनी या बैठकीला उपस्थित न राहता पुण्यातच थांबणे पसंत केल्यामुळे काका-पुतण्याच्या वादानंतर आता आजोबा-नातवामध्येही काही



आलबेल नाही का, अशी नवी चर्चा सुरू झाली आहे. या अनुपस्थितीनंतर आता शरद पवार नातवाची समजूत काढणार की रोहित पवार आपली भूमिका अधिक आक्रमक करणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

विरोधी बाकांवरून ज्या नेत्यांवर सातत्याने भ्रष्टाचाराचे आणि पक्षफ ुटीचे आरोप केले गेले, त्याच नेत्यांची पक्षाच्या सर्वोच्च नेत्यांनी जाहीर प्रशंसा केल्यामुळे रोहित पवारच नव्हे, तर शरद पवार गटातील इतर अनेक ज्येष्ठ नेत्यांम ध्येही संभ्रमावस्था निर्माण झाली आहे. कालपर्यंत ज्यांच्याविरोधात संघर्षाची भूमिका घेतली, त्यांच्याच बाबत मवाळ धोरण का, असा सूर पक्षांतर्गत उमटत आहे.

## महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे नाव आता 'महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग'

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाच्या नावात शासन निर्णयानुसार बदल आहे. यापुढे या आयोगाचा उल्लेख 'महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग' असा स्वतंत्र बदल करण्यात आला आहे.त्यानुसार, यापुढे कोणताही पत्रव्यवहार किंवा संपर्कासाठी महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग असाच उल्लेख करावा. प्रशासकीय इमारत पहिला मजला, डेअरी विभाग, अब्दुल गफार खान मार्ग, वरळी सीफेस, मुंबई, असा पत्रव्यवहारासाठी पत्ता असल्याची माहिती आयोगाचे सदस्य सचिव एस एन. पवार यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

## नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पातील तांत्रिक अडचणी दूर करणार –कृषीमंत्री दत्तात्रय भरणे

**मुंबई/प्रतिनिधी :** नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाच्या अंमलबजावणीत शेतकऱ्यांना येणाऱ्या तांत्रिक अडचणी तात्काळ दूर करून कार्यवाही करण्यात यावी, असे निर्देश कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिले.मंत्रालयात आयोजित नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीला व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे आमदार प्रकाश सोळंके, स्मार्ट प्रकल्पाचे प्रकल्प संचालक मीनल करणवाल तसेच उपसचिव कचरे उपस्थित होते.कृषी मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, शासनाच्या अटींनुसार फार्मर आयडीमधील आवश्यक दुरुस्त्या करून शेतकऱ्यांच्या अर्जांवर तातडीने कार्यवाही करावी. तुषार सिंचन संचासाठी ऑनलाइन अर्ज करताना येणाऱ्या अडचणी दूर करण्यावर भर द्यावा. तसेच रेशीम योजनेमधील अडचणी सोडविण्यासाठी रेशीम विभागासमवेत समन्वय ठेवून निर्णय घ्यावा, असे निर्देश त्यांनी दिले.कृषी मंत्री भरणे यांनी प्रकल्पाच्या अंमलबजावणीत येणाऱ्या तांत्रिक त्रुटी दूर करून शेतकऱ्यांना योजनांचा लाभ सुलभ आणि जलद पद्धतीने मिळावा, यासाठी प्रशासनाने संवेदनशीलतेने काम करण्याचे निर्देश दिले.

## महाराष्ट्रात डिजिटल जनजागृती आणि सुरक्षित मोबिलिटीसाठी रॅपिडो–महाआयटी करार

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील डिजिटल जनजागृती, डिजिटल समावेशन आणि सुरक्षित मोबिलिटी परिसंस्था मजबूत करण्यासाठी रॅपिडो आणि महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी कॉर्पोरेशन लिमिटेड (महाआयटी) यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत झालेल्या या कराराच्या वेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता मंत्री ॲड आशिष शेलार, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाचे सचिव परिमल सिंह, महाआयटीच्या आयुक्त भुवनेश्वरी एस., महाआयटीचे व्यवस्थापकीय संचालक संजय काटकर तसेच सीएसआर सहभागी उपस्थित होते.

या कराराद्वारे राज्यातील नागरिकांपर्यंत शासनाच्या डिजिटल सेवांची माहिती पोहोचविणे, कॅप्टन पडताळणी प्रक्रिया सक्षम करणे आणि शेवटच्या टप्प्यापर्यंत जनजागृती वाढविण्यावर भर देण्यात येणार आहे.

रॉप्पेन ट्रान्सपोर्टेशन सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड (रॅपिडो) ही देशातील सर्वात मोठी आणि परवडणारी मोबिलिटी सेवा देणारी कंपनी असून, तिच्या विस्तृत कॅप्टन नेटवर्कचा वापर करून महाराष्ट्र शासनाच्या डिजिटल उपक्रमांचा प्रसार करण्याचा या कराराचा उद्देश आहे. या सहकार्याअंतर्गत 'आपले सरकार', 'महा आयडी', 'महासारथी' यांसारख्या नागरिकाभिमुख डिजिटल सेवा आणि महाआयटीच्या विविध सार्वजनिक प्लॅटफॉर्मबाबत जनजागृती व वापर वाढविण्यासाठी रॅपिडोचे तंत्रज्ञान आणि कॅप्टन नेटवर्क उपयोगात आणले जाणार आहे.महाआयटीचे सुभाष शेळके यांनी सांगितले की, तंत्रज्ञान प्लॅटफॉर्म आणि मोठ्या प्रमाणावरील मोबिलिटी नेटवर्कच्या माध्यमातून राज्याच्या डिजिटल प्रशासन आणि नागरिक संपर्क उपक्रमांना बळकटी देता येईल. या करारातील महत्त्वाचा भाग म्हणजे रॅपिडो कॅप्टनसाठी डिजिटल पडताळणी आणि पार्श्वभूमी तपासणी प्रक्रिया अधिक सक्षम करणे. त्यासाठी 'महा आयडी'शी एकत्रीकरण करण्याचाही विचार आहे. यामुळे पारदर्शकता, विश्वास आणि प्रवासी सुरक्षितता अधिक मजबूत होईल. तसेच रॅपिडो कॅप्टनना तळागाळातील डिजिटल माहिती दूत म्हणून कार्य करण्याची संधी मिळेल, असे त्यांनी नमूद केले.

रॅपिडोचे सह–संस्थापक पवन गुंटुपल्ली यांनी सांगितले की, मोबिलिटी प्लॅटफॉर्म केवळ प्रवासापुरते मर्यादित नसून विश्वास, सुरक्षितता आणि नागरिक जनजागृती वाढविण्यातही महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. महाआयटीसोबतच्या या सहकार्याद्वारे सार्वजनिक डिजिटल उपक्रमांना चालना देतानाच नागरिकांना अधिक सुरक्षित आणि विश्वासार्ह मोबिलिटी अनुभव देण्याचे उद्दिष्ट आहे. या करारानुसार, महाराष्ट्रातील वापरकर्ते आणि कॅप्टन यांच्यापर्यंत शासनमान्य जनजागृती संदेश रॅपिडोच्या ॲपमधील बॅनर, नोटिफिकेशन आणि माहितीपर संदेशांच्या माध्यमातून पोहोचविले जाणार आहेत. त्यामुळे सार्वजनिक डिजिटल सेवांबाबत नागरिकांमध्ये जागरूकता वाढण्यास मदत होणार आहे. याशिवाय, महाराष्ट्रातील टियर–३ आणि टियर–४ शहरांमध्ये डिजिटल समावेशन आणि कौशल्यविकास उपक्रम राबविण्यासाठी 'महा–रॅपिडो फेलोशिप प्रोग्राम' सुरू करण्याचाही विचार दोन्ही संस्थांकडून करण्यात येत आहे. २०१५ मध्ये स्थापन झालेली रॅपिडो कंपनी देशातील ४०० हून अधिक शहरांमध्ये कार्यरत असून, बाइक टॅक्सी, ऑटो रिक्षा, कॅब, पार्सल डिलिव्हरी, फ्लाइट बुकिंग आणि फूड डिलिव्हरी अशा विविध सेवा पुरवते. कंपनीच्या माध्यमातून देशभरातील ९० लाखांहून अधिक लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत.

# माहेश्वरी समाजाच्या प्रगतीसाठी योगदान द्यावे : प्रदेशाध्यक्ष मधुसुदन गांधी

## जिल्हा माहेश्वरी सभा कार्यकारिणीच्या पदग्रहण सोहळा उत्साहात संपन्न



**लातूर/प्रतिनिधी :** राज्याच्या विकास व प्रगतीत योगदान देणारा माहेश्वरी समाज एकसंघ रहावा यासाठी राज्यभरात माहेश्वरी सभा कार्यरत आहे. माहेश्वरी सभा कार्यकारिणीच्या माध्यमातून राज्यातील अनेक जिल्ह्यामध्ये समाजाच्या उन्नती व प्रगतीसाठी विविध उपक्रम राबविले जात असून यामध्ये लातूर जिल्हाही पुढे आहे. लातूर जिल्हा माहेश्वर सभेची नुतन कार्यकारिणीची नुकतीच निवड झालेली असून नवनिर्वाचित पदाधिकारी ही परंपरा आबाधितपणे पुढे चालू ठेवतील, असा विश्वास व्यक्त करून नुतन कार्यकारिणीने माहेश्वरी समाजाच्या प्रगतीसाठी योगदान द्यावे, असे आवाहन सभेचे प्रदेशाध्यक्ष मधुसुदन गांधी यांनी केले आहे.

लातूर जिल्हा माहेश्वरी सभेची नुतन कार्यकारिणीची निवड झाली असून या कार्यकारिणीच्या पदग्रहण सोहळ्यात प्रदेशाध्यक्ष गांधी बोलत होते. यावेळी व्यासपीठावर माजी प्रदेशाध्यक्ष श्रीकिशन भन्साळी, महिला संघटनच्या प्रदेश सचिव सौ. अनिता मालू, जिल्हा माहेश्वरी सभेचे नुतन अध्यक्ष सी.ए.प्रकाश कासट, प्रदेशचे जनसंपर्क अधिकारी ओमप्रकाश तापडीया यांच्यासह नवनिर्वाचित सचिव राजेश मंत्री व जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ.हरिप्रसाद सोमाणी, बालकिशन मुंदडा,गोविंद कोठारी,फुलचंद काबरा, गोकुळदास चांडक आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते महेशपूजन करण्यात आले. यानंतर हनुमान रांदड यांनी महेश वंदना सादर केली.

महाराष्ट्रात माहेश्वरी समाज मोठ्या प्रमाणात असून या समाजाने राज्याच्या विकासात व प्रगतीत आपले योगदान नेहमीच दिले असल्याचे सांगत प्रदेशाध्यक्ष गांधी म्हणाले की, समाजाला एका धाग्यात बांधण्यासाठी माहेश्वरी सभा कार्यरत आहे. माहेश्वरी सभेच्या पदाधिकायांच्या माध्यमातून राज्यात माहेश्वरी समाजाचे संघटन वाढवत त्यांना एकजूट करण्यासाठी सातत्याने प्रयत्न होतात. समाज ज्यावेळी एकत्रित होतो त्याच वेळाला समाजाची प्रगती होते हाच इतिहास असून हा इतिहास न विसरता लातूर जिल्ह्यातील माहेश्वरी सभेच्या पदाधिकायांना आपले मतभेत व मनभेद बाजूला ठेवत आगामी तीन वर्ष समाज हितासाठी कार्यरत रहावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. जिल्हा पदाधिकायांच्या माध्यमातून समाजातील युवकांना दिशा देण्यात काम व्हावे, असे सांगून युवकांना समाजाची संस्कृती व संस्कार समजावून सांगत ते जोपासण्यासाठी प्रयत्न व्हावेत, असे आवाहन केले.

जिल्हा माहेश्वरी सभेचे अध्यक्ष म्हणून दुसयांदा काम करण्याची संधी दिल्याबद्दल समाज बांधवांचे आभार व्यक्त करत जिल्हा माहेश्वरी सभेचे अध्यक्ष सी.ए. प्रकाश कासट यांनी हे पद नसून जबाबदारी असल्याचे स्पष्ट केले. मागील काळात सर्वांच्या सहकार्यातून लातूर जिल्ह्यातील माहेश्वरी समाजाने चांगले काम करत राज्यात आपला ठसा उमटविला असल्याचे सांगितले. याचीचीच पुनरावृत्ती करत समाजाच्या प्रगतीसाठी आगामी काळात प्राधान्य देण्यात येईल, अशी ग्वाही दिली. त्याच बरोबर समाजाचा सांस्कृतिक वारसा जोपासत युवा वर्गाला योग्य दिशा देण्याचा संकल्प करत समाजातील मातृशक्तीला म्हणजेच महिला संघटनेला अधिक बळकटी देण्यासाठी काम करण्यात येईल, असे सांगितले.

याप्रसंगी निवडणुक निर्णय अधिकारी हरिप्रसाद सोमाणी यांनी निवडणूक काळातील आपला अनुभव सांगत नुतन कार्यकारिणीची घोषणा केली. यावेळी प्रदेशाध्यक्ष मधुसुदन गांधी व मान्यवरांच्या हस्ते जिल्हा माहेश्वरी सभेतील नुतन पदाधिकारी यांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये अध्यक्ष सी.ए. प्रकाश कासट, सचिव राजेश मंत्री, उपाध्यक्ष चांदकिरण लड्डा, विष्णूदास मंत्री, शामसुंदर मानधना, सहसचिव गोकुलदास चांडक, दिलीप सोमाणी, नंदकिशोर कर्वा, संघटनमंत्री फुलचंद काबरा, कोषाध्यक्ष जगदीश भुतडा व प्रचारप्रमुख नंदकिशोर लोहिया यांचा समावेश आहे. याप्रसंगी नवनिर्वाचित अध्यक्ष सी.ए. प्रकाश कासट यांनी त्यांच्या अधिकाराचा वापर करत उपाध्यक्ष म्हणून लातूर येथील रामेश्वर पुनपाळे व उदगीरचे अशोक बाहेती यांची नियुक्ती केली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन लक्ष्मीकांत सोनी व ईश्वरप्रसाद बिदादा तर आभार प्रदर्शन फुलचंद काबरा यांनी केले. कार्यक्रमासाठी लक्ष्मीरमण लाहोटी, रमेश राठी यांच्यासह लातूर शहर व जिल्ह्यातील माहेश्वरी समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी समाजातील विविध पदाधिकारी व सदस्यांनी परिश्रम घेतले.

# 'एल निनो'च्या पार्श्वभूमीवर लातूर जिल्ह्यात वैरण विकास योजना सुरू

## चारा बियाण्यांसाठी १०० टक्के अनुदान – २८ मे पर्यंत ऑनलाईन अर्जाचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** हवामान विभागाने यंदाच्या वर्षात 'एल निनो'च्या प्रामुख्याने प्रभावामुळे पावसाचे असमान वितरण, कमी पर्जन्यमान आणि संभाव्य दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता वर्तविली असून या पार्श्वभूमीवर भविष्यात पशुखाद्य व हिरव्या चाऱ्याची गंभीर टंचाई निर्माण होवू शकते. ही संभाव्य टंचाई लक्षात घेऊन जिल्ह्यातील पशुपालकांनी आतापासूनच नियोजन करुन चारा उत्पादन वाढविणे अत्यंत आवश्यक असल्याचे आवाहन पशुसंवर्धन विभागामार्फत करण्यात आले आहे. या समस्येवर मात करण्यासाठी सन २०२६–२०२७ या आर्थिक वर्षात जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत ''वैरण विकास योजना चारा उत्पादक कार्यक्रम'' राबविण्यात येत आहे.



या योजनेतंर्गत पात्र पशुपालकांना १०० टक्के अनुदानावर संकरीत मका व ज्वारी बियाणे पुरवठा करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील पशुपालकांनी या संधीचा लाभ घेऊन स्वतःच्या शेतामध्ये मोठ्या प्रमाणात हिरव्या चाऱ्याचे उत्पादन करावे आणि भविष्यातील टंचाई लक्षात घेऊन तयार होणारा चारा सायलेज, हाय किंवा चारा साठवण पद्धतीद्वारे जतन करून ठेवावा, असे आवाहनही जिल्हा पशुसंवर्धन विभागाने केले आहे.

या योजनेची प्रमुख उद्दिष्टे भविष्यातील चारा टंचाई टाळणे, पशुधनासाठी वर्षभर पौष्टिक हिरवा चारा उपलब्ध करणे, दूध उत्पादन वाढीस चालना देणे, पशुपालकांचे आर्थिक नुकसान कमी करणे आणि नैसर्गिक आपत्ती व दुष्काळ परिस्थितीत पशुधन संरक्षण करणे ही आहेत. या योजनेतंर्गत वैयक्तिक शेतकरी व नोंदणीकृत शेतकरी समूह गटांना १०० टक्के अनुदानावर चारा बियाणे व ठोंबे उपलब्ध करून दिले जाणार असून, त्यांना हिरवा चारा उत्पादनासाठी प्रोत्साहन आणि चारा साठवणुकीबाबत मार्गदर्शनही केले जाईल.

योजनेच्या पात्रता निकषानुसार वैयक्तिक शेतकऱ्याकडे स्वतःची जमीन, सिंचन सुविधा, किमान ३ ते ४ पशुधन असणे आणि १ हेक्टर क्षेत्रावर चारा उत्पादन घेण्याची तयारी असणे आवश्यक आहे; तर शेतकरी समूह गटांसाठी नोंदणीकृत समूह गट असणे आवश्यक असून ५ हेक्टर क्षेत्राची मर्यादा लागू राहील. अनुदानाच्या स्वरूपाचा विचार केला असता, वैयक्तिक लाभार्थ्याला १ हेक्टरसाठी चार हजार रुपयांपर्यंत १०० टक्के अनुदान, तर शेतकरी समूह गटाला ५ हेक्टरसाठी २० हजार रुपयांपर्यंत अनुदान अनुज्ञेय राहील. या योजनेचा लाभ घेण्यासाठी सातबारा उतारा, लागू असल्यास वनहक्क प्रमाणपत्र, पशुधनाचा पुरावा आणि समूह गट नोंदणी प्रमाणपत्र (लागू असल्यास) ही आवश्यक कागदपत्रे जोडणे गरजेचे आहे.

या योजनेतंर्गत ऑनलाईन अर्ज प्रक्रिया दि. २० ते २८ मे २०२६ या कालावधीत सुरू राहणार असून, अर्जासाठीची गुगल फॉर्म लिंक जिल्हा परिषदेच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. आज उत्पादित केलेला आणि योग्य पद्धतीने साठवून ठेवलेला चारा भविष्यातील दुष्काळ व टंचाई काळात पशुधनासाठी जीवनदायी ठरणार असल्याने प्रत्येक पशुपालकाने ही योजना गांभीर्याने घेऊन तात्काळ अर्ज करावा, असे आवाहन पशुसंवर्धन विभागामार्फत करण्यात आले आहे. या योजनेच्या अधिक माहितीसाठी संबंधित तालुका पशुसंवर्धन कार्यालय, पशुवैद्यकीय दवाखाना किंवा जिल्हा पशुसंवर्धन कार्यालय, लातूर येथे संपर्क साधावा, असे आवाहन लातूरचे जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय डॉ. पडीले आर. डी. यांनी केले आहे.

# ऊस तोडणी कंत्राटदाराला चेक बाउन्स प्रकरणात २ महिने कारावास

## लातूर न्यायालयाचा निर्णय ऊस तोडणी वाहतूक कंत्राटदारांना धक्का

**लातूर/प्रतिनिधी :** ऊस तोडणी व वाहतुकीचे कंत्राट घेऊन विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा सहकारी साखर कारखाना यांची फसवणूक केल्याप्रकरणी मे अतिरिक्त दंडाधिकारी १० वे लातूर न्यायालयाने आरोपी कंत्राटदार संजय शंकर शिंदे राहणार सारोळा तालुका जिल्हा उस्मानाबाद यास चेक बाऊन्स प्रकरणी दोषी ठरवत २ महिन्याची साधी कारावासाची शिक्षा व तक्रारदार यास ३ लाख ५२ हजार ८६६ रूपये नुकसान भरपाई देण्याचे आदेश दिल्याने खळबळ उडाली असून अनेक साखर कारखान्यात उस तोडणी कंत्राटदार अँडव्हान्स रक्कम घेतात अर्धवट काम सोडून निघून जातात अशा कंत्राटदाराना या निकालामुळे धक्का बसला आहे

काय आहे नेमके प्रकरण

आरोपी संजय शिंदे यांनी सन २००९–१० गळीत हंगामासाठी मांजरा साखर कारखान्यासाठी ऊस तोडणी व वाहतुकीसाठी करार केला होता कंत्राटानुसार काम करण्यासाठी त्याने कारखान्याकडून वेळोवेळी ऍडव्हान्स रक्कम घेतली होती मात्र पैसे घेवुन करारानुसार वेळेवर काम केले नाही कारखान्याने वेळोवेळी पैशाची मागणी लावून धरल्यानंतर थकित रक्कम परतफेड करण्यासाठी आरोपिने कारखान्यास धनादेश दिला मात्र बँकेतून रक्कम नसल्याने अपुरी रक्कम निष्क्रिय खाते म्हणून दिलेला धनादेश परत आला त्यामुळे कारखान्याने कायदेशीर नोटीस बजावली आरोपीने पैसे न दिल्यामुळे कारखान्याने मे न्यायालयात आरोपीला निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्ट चे कलम १३८ चे प्रकरण न्यायालयात दाखल केले

विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखाना ली. विलासनगर चिंचोलीराव वाडी तालुका जिल्हा लातूर यांच्यावतीने हा खटला दाखल करण्यात आला होता मे न्यायालयाने तक्रारदाराच्या पुराव्याचे निरीक्षण करून व तक्रारदाराचे विधीज्ञ यांनी केलेला अंतिम युक्तीवाद ग्राह्य धरून आरोपीला निगोशिएबल इन्स्ट्रुमेंटअॅक्ट चे कलम १३८ च्या अंतर्गत दोषी ठरवत आरोपीस ९ टक्के वार्षिक दराने १ लाख ८३ हजार २१६ रूपये व्याज आकारून एकूण ३ लाख ५२ हजार ८६६ रुपये भरपाई देण्याचे आदेश दिले आहेत तसेच सदर रक्कम एक महिन्यात न भरल्यास आरोपीला १५ दिवसाची अतिरिक्त कारावासात ठेवण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत तक्रारदारांच्या वतीने एडवोकेट राजेंद्र काळे यांनी काम पाहिले

# औषधी विक्रेत्यांच्या देशव्यापी बंदला लातूर जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद

**लातूर/प्रतिनिधी :** अखिल भारतीय औषधी विक्रेत्यांच्या देशव्यापी बंदला बुधवारी लातूर जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. लातूर जिल्ह्यातील सर्व औषधी विक्रेत्यांनी आपआपली औषधी दुकाने बंद ठेऊन बंद यशस्वी केला. लातूर शहरातील महात्मा गांधी चौकात सकाळी साडेनऊ ते दुपारी एक या वेळेत धरणे आंदोलनही करण्यात आले.

ऑल इंडिया केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनने बेकायदेशीर ऑनलाईन औषध विक्रीच्या विरोधात बुधवार, दि. २० मे २०२६ रोजी देशव्यापी बंदचे आवाहन केले होते. या आवाहनानुसार लातूर जिल्ह्यातील औषधी विक्रेत्यांनी या बंदमध्ये १०० टक्के सहभाग नोंदविला. औषध विक्री व्यवसाय हा औषधे आणि सौंदर्य प्रसाधने अधिनियमांतर्गत चालवला जातो. औषधांची ऑनलाईन विक्री करण्यासंदर्भात अधिनियमात कोणतीही तरतूद नाही. तरीही केंद्र सरकारने इंटरनेटच्या माध्यमातून ऑनलाईन औषध विक्रीबाबतची सूचना जारी केली होती. त्या सूचनेचे अद्याप कायद्यात रूपांतर झालेले नसतानाही देशात बेकायदेशीर ऑनलाईन औषध विक्री सुरु आहे. यासंदर्भात दिल्ली उच्च न्यायालयात याचिका दाखल असून दिल्ली उच्च न्यायालयानेही ऑनलाईन औषध विक्रीस स्थगितीही दिली आहे. असे असतानाही सरकार औषधी विक्रेत्यांच्या मागणीकडे सातत्याने दुर्लक्ष करत आहे. सरकारने कोरोनाच्या काळात औषधांच्या होम डिलिव्हरी देण्याबाबत विशेष सूट दिली होती. कोरोना संपूनही बराच काळ उलटला तरी याबाबतची अधिसूचना रद्द करण्यात आलेली नाही. याचा गैरफायदा घेऊन ऑनलाईन औषध विक्री केली जात आहे. यामुळे अनेक छोटे व्यावसायिक – औषध विक्रेते अडचणीत येत आहेत. ग्रामीण भागातील औषधी वितरण व्यवस्था धोक्यात येत आहे. यासंदर्भात शासन – प्रशासनाकडेही वारंवार निवेदने देण्यात आली आहेत. तरीही यावर अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आली नसल्याच्या निषेधार्थ सदर देशव्यापी बंदचे आवाहन करण्यात आले होते.

बंद दरम्यान अत्यावश्यक सेवेसाठी रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांची गैरसोय होऊ नये यासाठी जिल्हा केमिस्ट असोसिएशनने जिल्ह्यातील दहाही तालुक्यात पर्यायी व्यवस्था कार्यान्वित केली होती. त्यामध्ये लातूर तालुक्यासाठी ईश्वर बाहेती, नागेश स्वामी, औसा संजय भालकीकर, शेख, निलंगा बालाजी थेटे , राजकुमार धूत, शिरूर अनंतपाळ प्रदीप पाटील, तानाजी सुरवसे, देवणी उध्दव मल्लेशे, महेश हुडगे, उदगीर सत्यवान सूर्यवंशी, रामकुमार सोनटक्के, जळकोट प्रकाश गट्टेवार, अनंत सिद्धेश्वरे, अहमदपूर संगमेश्वर नीला, धनंजय कोत्तावार, चाकूर अरविंद बिरादार,विनोद नीला, रेणापूर श्रीकांत वाघमारे, सुनील बरुरे या पदाधिकाऱ्यांचे भ्रमणध्वनी क्रमांक ग्राहकांना उपलब्ध करून देण्यात आले होते. औषधी विक्रेत्यांचा बंद असला तरी अत्यावश्यक औषधींसाठी रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांची गैरसोय होऊ नये याकरिता ही काळजी घेण्यात आल्याचे जिल्हा केमिस्ट असो. चे अध्यक्ष रामदास भोसले यांनी सांगितले.




लातूर जिल्ह्यातील सर्व औषधी विक्रेत्यांनी या बंदमध्ये सहभाग नोंदवल्याबद्दल लातूर जिल्हा केमिस्ट अँड ड्रगिस्ट असो.चे अध्यक्ष रामदास भोसले, सचिव अरुण सोमाणी, उपाध्यक्ष ओमप्रकाश बाहेती, अनिल स्वामी, धनंजय जोशी, सत्यवान सूर्यवंशी, रामकुमार सोनटक्के, सहसचिव प्रकाश साखरे, ईश्वरचंद्र बाहेती, अंकुश भोसले, संगमेश्वर नीला, कोषाध्यक्ष अतुल कोटलवार, रमेश भांगडिया, नाथराव मुंडे, नागेश स्वामी, सौ. दीपाली निनगुरकर, जयप्रकाश रेड्डी, बालाजी थेटे, रमाकांत भुरकापल्ले आदींनी सर्वांचे आभार व्यक्त केले आहेत.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.